# प्रकरण तिसरे
# 'राजमुद्रा' व 'सूर्यझेप आणि तळगर्भ' या काव्यसंग्रहांचा आशय
## १) 'राजमुद्रा' काव्यसंग्रहातील आशय

कवी रविचन्द्र हडसनकर प्रस्तूत काव्य संग्रहात म्हणतात की, डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेली समता आज अस्तित्वात नाही. ती बोधी वृक्षाला टांगली जात आहे. जो तो वेगवेगळ्या गटा-तटाच्या फांद्या पकडून बसला आहे. गोरगरीब जनतेला वेटीस धरतो आहे. यावर उपाय म्हणून कवी माणुसकीच्या दिशेने झेपाविण्याचा प्रयत्न करतो. डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''त्यांची कविता क्रांतीच्या दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या माणसांची आणि माणुसकीच्या शोधाची आहे. ती गोंडस अभिव्यक्तीची झूल पांघरणारी नाही. मूल्यगर्भ आशय हीच तिची प्रकृती आहे.''[१]

प्रस्तूत काव्यसंग्रहातील विचार जहाल मूल्यगर्भ, आशयगर्भ आहे. जुने घालवून, प्रस्थापितांना नाकारुन, नवीन मानसिकता निर्माण करणारी हडसनकरांची कविता आहे. नव्या सांस्कृतिक विचारांच्या शोधात त्यांची कविता सतत फिरत आहे. त्याचा शोध 'राजमुद्रा' या कविता संग्रहाच्या आधारे घ्यावयाचा आहे.

### १) तरुण पिढीला स्वत्वाची जाणीव करुन देणाऱ्या कविता :

कवी रविचन्द्र हडसनकरांनी नवीन तरुण पिढीला अतिशय चांगल्या प्रकारे सल्ला देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जे काही झाले ते विसरुन जा आणि येथून पुढे तुला आता नवीन मानसिकता निर्माण करावयाची आहे. मित्रा.... या कवितेत रविचन्द्र हडसनकर म्हणतात, ''

''मित्रा... !
ती पहा .. नवी पहाट होत आहे.
घनतमाला पचवून
ती निळे गीत गात आहे.... मित्रा...
वळून मागे पाहू नकोस

अवसान गळेल

पुन्हा वैराग्नीत

तुझे माझे घर जळेल....''[२] पृ. क्र. ७

कवी म्हणतो, मित्रा जे झाले ते होऊ दे पण येथून पुढे होणार नाही याची तू काळजी घे कवी म्हणतो, मित्रा तू पाठीमागे वळून बघू नको. आता तू तुझी सदृढ अशी मानसिकता तयार कर आणि तू धैर्याने धाडसाने संकटाला सामोरे जा. जर का मागे वळून बघण्याचा प्रयत्न केला तर पूर्णपणे तुझी शक्ती, ताकत नष्ट होईल आणि पुन्हा तेच ती जाळपोळ दंगल आणि यातच तुझे आणि माझे घर जळल्याशिवाय राहणार नाही. कवी रविचन्द्र हडसनकरांनी आजच्या तरुणाला अतिशय चांगला सल्ला देताना दिसून येतो.

रविचन्द्र हडसनकरांना अजून कांही तरी सांगावयाचे आहे ते म्हणतात, आता या जगात माणूस हा अतिशय निर्दयपणे वागत आहे. कोणतेही कारण शोधून दंगल, मारामाऱ्या करताना दिसून येतो. ते त्या तरुणाला सावध राहवयास सांगतात,

''मित्रा....!

पुन्हा घडू नये दंगल,

जरा जपूया घडावे सारेच मंगल....

निमित्त शोधात,

माणुसकीची कत्तल करणारे हात,

मित्रा, ....तुझा अन् माझा

कधी ही होईल घात...''[३] पृ. क्र. ७

कवी म्हणतो, मित्रा या समाजात काही माणसे असे आहेत की, माणुसकी नष्ट करणारे आहेत. माणसाला माणूस म्हणून न ओळख देणारे आहेत. तर मित्रा यापुढे दंगल घडू नये. याची आपण काळजी घेऊ आणि सर्वत्र कशी आनंदीत माणसे जीवन जगताना दिसून येतील. कवीच्या या काव्यपंक्तीतुन असे जाणवते की, आधुनिक

पिढीमध्ये वास्तव जीवन जगत असताना एका मित्राने दुसऱ्या मित्राला चांगल्या प्रकारे सल्ला दिलेला दिसून येतो.

कवीने सभोवतालचे जीवन ही अनुभवलेले दिसून येते. हडसनकरांना आपल्या आसपास जे लोक राहतात ते चांगल्या विचारांचे नसतात काही चांगल्या विचारांचेही असतात. चांगल्या विचाराच्या माणसांमध्ये एकात्मता दिसून येते, असे कवीला वाटते म्हणून कवी म्हणतो,

''द्वेषाचे बीज पेरणारे,
अवती भवती दगेबाज,
हे तुला अन् मला,
जाणावेच लागेल आज....
उद्याचा उद्या तुझा माझा,
सम्यक व्हावा,
माणसांसाठी
समतेचा अभंग गावा....
प्रकाश प्रज्ञेला अर्थ देऊ
एवढे असू दे भान,
छानसे सुटेल जुळून येईल.
मानव्याचे वृंदगान...''[४]

कवीला असे सांगावयाचे आहे की, आज या समाजात कांही लोक असे आहेत की, ते प्रत्येक माणसाच्या मनात राग कसा निर्माण होईल व त्याच्यामध्ये कसे वाद निर्माण होतील हे बघण्यासाठीच त्यांचे डोळे उघडे आहेत, असे काही दगा देणारी माणसे आहेत. तर तेच तुला अन् मला ओळखावयाचे आहे. आणि त्यामुळे तु आणि मी एकत्र आले पाहिजे. केवळ माणसासाठीच आपण सर्व एकत्र येऊन समानतेचा अभंग म्हणावयाचा आहे. जे काही सत्य आहे ते उजेडात आणू एवढे मात्र भान असू दे.

चांगली अशी मानवी एकता निर्माण होईल असे कवी सांगतो. कवीची सर्व माणसाने एकत्र येऊन एकात्मता निर्माण करावी ही एकच इच्छा आहे.

तसेच रविचन्द्र हडसनकरांनी समाजातील जे भान विसरलेले माणसे आहेत. ज्यांना माणुसकीचा विसर पडलेला आहे. त्या लोकांनी खुशालशस्त्र उगारु द्या. तरी पण आपला सयंम सोडू नका. आणि आपल्या हातानी दुसऱ्याच नाश करु नका. मित्रा एवढे कर मी ही माणूस आणि तू ही माणूस आहे एवढी जाण ठेव, असे कवी म्हणतो.

''मित्रा, .... बेभान जथ्याला,
खुशाल शस्त्र उगारु दे,
पण आपला संयम ढळू नये,
विनाशाकडे,
आपला पाय वळू नये, ...
ते जाऊ दे... इतके करता येईल.
तुला अन् मला,
तू जाणवे मला, मी जाणवे तुला
'मित्रा ... ती पहा नवी पहाट होत आहे.'[५] ...

'ईज कडाडवं तसं' या कवितेत कवी रविचन्द्र हडसनकरांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितलेले आहे. शिक्षण घेतल्यानंतरचे माणूस हा ज्ञान प्राप्त होतो. चांगले काय वाईट काय हे शिक्षणामुळेच मनुष्याला कळते, शिक्षणामुळे मनुष्य ज्ञानी बनतो, त्यामुळे रविचन्द्र हडसनकर शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगताना म्हणतात,

''ईज कडाडावं तसं
अन्यायावर तुटून पड
शिक्षणाच्या शिखरावर
नेटानं तू बाप्पा चढ... ''[६] पृ. क्र. ४६

कवीला असे वाटते की, जर तुझ्यावर अन्याय, अत्याचार होत असेल तर तू त्यास प्रतिकार कर आणि त्या अन्यायावर जशी वीज ढगामध्ये कडाडते व ती कोणत्याही ठिकाणी खाली पडते व सर्व नाश करते. तशाप्रमाणे तू अन्यायावर तुटून पड. सर्वपणाला शक्ती लावून शिक्षण घे. रविचन्द्र हडसनकरांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे ते यावरील काव्य पंक्तीतून दिसून येते.

कवी हडसनकर दलित समाजाला आधुनिक युगामध्ये चांगले जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन देतात. सध्याचा समाज वाम मार्गाला जात आहे. आपण जीवन जगत असताना काय करावे, काय करु नये हेही तरुणाला भान राहिलेले नाही. त्यामुळे हडसनकर 'ईज कडाडाव तसं' या कवितेत म्हणतात,

वाहनाऱ्या झऱ्यावनी,
ईच्चाराची धार ठेव,
ईमानाची एक तारी,
तिची सुरामधी तार ठेव.[७] पृ. क्र. ४६

नव तरुणाला सल्ला देताना कवी म्हणतो. पाण्याचा झरा जसा वाहतो, तसा तुझ्या मनामध्ये विचार सतत वाहणारे असावेत व विमानाचा हवेत जसा एकसूरात आवाज येतो. तसा तू तुझ्या आवाजात सूर बाळगायला हवा. कवीने झरा व ईमान ह्या प्रतिमाच्या माध्यमातून तरुणाला समाजाला प्रेरणा दिलेली आहे.

'ईज कडाडाव तसं' या कवितेत कवी हडसनकर तरुणाला बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा घेण्यास सूचवितात ते म्हणतात, बाबासाहेबांचा विचार तुला चांगला मार्ग दाखवेल आणि त्यांचे विचार तुला आयुष्यभर पुरणारे आहेत. तेंव्हा पुढे हडसनकर म्हणतात,

पिढ्यानपिढ्या पुरणारी,
नाही तिची मोजदाद
'बाबा' ची ही शिदोरी

खरी तू ही जायदाद .... [८] पृ. क्र. ४६

कवी तरुणाला सांगतो, या जगात सोनं, चांदी, पैसा ही तुझी संपत्ती नाही. खरी तुझी संपत्ती बाबासाहेबांचे आचार विचार हीच आहे. आणि ती तुला आयुष्यभर पुरुन शिल्लक राहणारी आहे, असे कवीला येथे तरुणाला सूचवायचे आहे.

'नव्या युगाची आशा तू' या कवितेत रविचन्द्र हडसनकरांनी जीवनात निराश झालेला तरुणाला चांगला मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला त्याची आयुष्यामध्ये सुखी जीवन जगण्यासाठी समाजातील जे गोरगरीब जनता आहे. त्यांच्याकडे कटाक्षाने लक्ष देण्यासाठी सूचविले आहे. कवी तरुणाला उद्देशून म्हणतात,

नव्या युगाची आशा तू ...
परिवर्तनाची भाषा तू....
चंदनाची काया तू....
जिव्हाळ्याची माया तू....
प्रेरकतेची शक्ती तू...
भक्तीचीही भक्ती तू...
उन्हातली छाया तू,
प्रज्ञेचाही पाया तू...
स्वर्गीय सुखाचा ठेवा तू....
मेण्याहुन असली मेवा तू [९] पृ.४७

कवी म्हणतो, आता जुने युग संपलेले आहे. आता नवीन युग सुरु होत आहे. तर या नवीन युगाचा तूच बदल करावयाचा आहेस. समाजात जी विषमता निर्माण झाली आहे ती तूच दूर करावयाची आहेस. प्रत्येक जाती जातीतला माणूस एकच आहे. हे तुला सांगावयाचे आहे. या समाजातील गोर-गरिबांची माया तू आहे. हे कवी ठामपणे सांगतो. म्हणून कवी म्हणतो, या गोरगरींबांसाठी झिजत राहून तू त्यांची काळजी घ्यावयाची आहेस. येथे रविचद्र हडसनकरांनी माणुसकीचे दर्शन घडविल्याचे

दिसते. या वरील काव्यपंक्तीतून कवीने तरुणाला मोलाचा संदेश दिलेला आहे, असे दिसून येते.

'सूर्यकुळाचा समृद्ध' या कवितेत हडसनकरांनी समाजाला या समाजजीवनात जगत असताना मी, ही माणूस आहे आणि तू ही माणूस आहे याप्रमाणे वागू असा सल्ला दिला आहे. आपण माणसात वागत असताना जात पात ही सर्व सोडून द्या. ज्या काही कर्मठ समाज कंटकाने माणसा माणसामध्ये जात धर्म निर्माण केले होते. ते सर्व विसरा व माणसांसाठी माणसाप्रमाणे वागा असे सांगताना दिसतात.

''उतरंड ती जातींची,
युगंधराने फोडली,
पोट जात तरी तुझी
अजून तू ना सोडली ''[१०] पृ. क्र. ५०

कवी म्हणतो, युगधरांने जे काही जात-पात निर्माण झाली ती सर्व नष्ट केली व सर्व माणसांना एकत्र आणून माणूस हा एकच आहे, असे सांगतले म्हणून कवी तरुणाला म्हणतो, या जातीधर्मातून बाहेर ये व सर्व माणसे एक आहेत, असे ठामपणे सांग, असे कवी तरुणाला सूचवितो. कवीने या वरील काव्यपंक्तीतून तरुणाला जाती व्यवस्थेतून बाहेर काढून चांगला सल्ला दिल्याचे येथे जाणवते.

'अत्याचार जुना येताहे नव्याने' या कवितेत रविचन्द्र हडसनकर म्हणतात, समाजामध्ये पूर्वी अन्याय, अत्याचार होत होते. नंतर काही समाजातील लोकांनी चळवळी, आंदोलने करुन अन्याय, अत्याचाराला दूर केले. म्हणून माणूस हा समाजात एकत्रितपणे जीवन जगाताना दिसून येत होता. परंतु हे फार दिवस असे राहिले नाही. म्हणून कवी म्हणतो,

अत्याचार जुना येता हे नव्याने,
एकत्र जमावे, पांगल्या थव्याने,
तुझी पत्रावळी, त्यात दुजे द्रोण,

षडयंत्र ऐसे, रचताहे कोन ?[११] पृ. क्र. ५२

कवी म्हणतो, जे अन्याय, अत्याचार करणारे हात होते, ते थांबले होते. परंतु नंतर नव्या जोमाने, नव्या दमाने तो अन्याय, अत्याचार करणारे हात येत आहेत. तर जो विस्कळत समाज झालेला आहे. राजकारणामुळे समाजातील लोक वेगवेगळ्या फांद्या पकडून बसले आहेत. त्यांनी सावध होऊन या येणाऱ्या अन्याय, अत्याचाराला थांबविले पाहिजे. वेगवेगळा झालेला थवा तो एकत्रित आला पाहिजे. हा जो समाज एकत्र आहे तो विस्कळीत कोण करतो, हे षडयंत्र कोण रचते हा कवीला प्रश्न पडला आहे. येथे कवीने या तरुणाला सावधपणाचा सल्ला दिलेला दिसून येतो. समाजातील एकत्रित लोकांना कवीने, 'थवा' ही प्रतिमा वापरल्याचे दिसून येते.

''बधवेना त्यांना तुझे मुक्त श्वास '', या कवितेत समाज हा साखळदंडाच्या बेडीत राहिलेला नाही. तो आता शिकून सवरुन आपली प्रगती करतो आहे तो आता कोणाकडे भीक मागत नाही. ते स्वबळावर हळू हळू येत आहे. म्हणून कवी हडसनकर म्हणतात.

''बघवेना त्यांना, तुझे मुक्त श्वास,
खुडण्याचा ध्यास, जोमधरी,
चढत्या उन्हात, चढे तिरस्कार,
पुन्हा बहिष्कार दवंडीने ..... ''[१२] पृ. क्र. ५३

कवी म्हणतो, या मागासलेल्या सामाजातील माणसाचा विकास झालेला त्यांना कधीच आवडणार नाही. या समाजातील माणूस हा मोकळा श्वास घेत आहे तो आता स्वतंत्र झाला आहे. त्याच्यावर कोणाचेही बंधन नाही. तरी ही या सनातन वाद्यांनी पुन्हा या माणसांवर बहिष्कार टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. कवीने येथे अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

'कव्हा फुटंल काय नेम' या कवितेत तरुण पिढी ही आता समाजापासून भरकटलेली आहे. त्यांनी आता समाजाशी नाळ तोडली आहे. तो आता व्यासनी बनत

चालेले आहेत. समाजातील माणसाशी त्यांना काही देणे घेणे नाही. म्हणून कवी म्हणतो,

''माणसाच्या जलमाला ,

जरा सर्था की लाव,

उनं दुनं सडकं जीनं,

नको मिशीला ताव...

अंधारात दिव्यावानी,

जळायला शिकावं,

संकटाच्या वावधानी,

मूळासकट टिकावं...''[१३] पृ. क्र. १९

कवी हडसनकर म्हणतात, माणूस हा जन्म एकदाच आहे तो पुन्हापुन्हा नाही. म्हणून या तरुणाला कवी जागे करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतो. तरुण वर्ग भरकटलेले, सडलेले जीवन जगत आहे, असे कवीला सांगावयाचे आहे. आणि पोटाला अन्न नाही. पोटामध्ये कावळे ओरडतात ते असून ही तरुण हा मिशीवर हात फिरवत आहे. तर हे काही उपयोगाचे नाही. तर तू या समाजासाठी अंधारात जसा दिवा प्रकाश देतो, आधार देतो व स्व:ता जळून दुसऱ्याला प्रकाश देतो. तसा तू या दिव्यावानी स्वता: जळून इतरांना प्रकाश देत राह. कोणत्याही संकटाला सामोरे जा. संकटाशी झूंज दे तरच यश आहे नाही तर अपयश येथे कवीने चांगला मोलाचा उपदेश केलेला दिसून येते. वरील काव्यपंक्ती जणू काही तरुणाला वास्तवाचे भान करुन देतात.

'आभाळ कोसळू दे' या कवितेत तरुणाची मानसिक स्थिती योग्य चांगली राहिलेली नाही. त्याचा आत्मविश्वास कमी कमी होत चाललेला आहे. यातून कवी तरुणाला झोपेतून उठविण्याचा प्रयत्न करतात म्हणून कवी म्हणतो,

''आभाळ कोसळू दे,

डगमगू नको,

तुझे विश्व तुझे आहे, ...

तुझ्या प्रज्ञेत फुले आहे,

तुझ्या बाहुत शाहू आहे,

तुझ्या रक्तात भीम आहे ''[१४] पृ. क्र. ६१

कवी म्हणतो, कितीही तुझ्यावर संकटे आली तरी तू भिऊ नकोस, आता हे जग तुझेच आहे. तुला स्वतंत्र आहे. कारण तुझ्याजवळ फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा तुझ्याजवळ आहे आणि तुझ्या रक्तात नसानसात भीम उतरला आहे. त्यामुळे तू आत्मविश्वासानं लढ कवीने तरुणाला आत्मविश्वासनं जगण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार पोहचविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. तरुणाला कवीने शक्ती, बळ दिल्याचे वरील काव्यपंक्तीवरुन जाणवते.

## २) क्रांतीकारी पडसाद उमटविणाऱ्या कविता :

'स्मृतीदोष बापाच्या स्मृती' या कवितेत क्रांतीकारी नेत्यांनी समाजाला अंधश्रध्देतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून कवी म्हणतो,

''अखेर....

काळाआड दडतांना,

माझा बाप ठेवून गेला वारसा हक्क,

पेरुन गेला अभयाची पेरणी,

अन् पेटवून गेला क्रांती ज्योत नसा नसात,

निर्वाणीचं बाप बोलला,

''पोरा, एकच लक्षात ठेव !

वाघांच्या बछाड्याचा,

कुणी बळी देत नसतात,

कुणी बळी देत नसतात:''[१५] पृ. क्र. १२

कवी म्हणतो, शेवटच्या क्षणात असताना बापाने निघून जाण्याच्या अगोदर ह्या समाजातील माणसांना सुखानं जीवन जगता यावं यासाठी तो किती तरी संकटांना सामोरे गेला. पण तो कोणालाच डगमगला नाही. बापाने कोणतेही मनात भय बाळागले नाही. असं धाडसाचं लिखान करुन गेला. ते आपल्या गोरगरीब समाजातील सुशिक्षितांसाठी बाप प्रत्येक मुलाला एकच सांगून गेला ते म्हणजे 'वाघाच्या बछाड्याचा कुणी बळी देत नसतात,' येथे कवीने 'बाप' हा शब्द बाबासाहेबांना उद्देशून वापरल्याचे दिसून येते. वरील काव्यपंक्तीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आलेख शब्दबद्ध करताना दिसतात.

'समता, ममता करुणेचे शांती घोष' या कवितेतून कवी म्हणतो, अन्याय, अत्याचार सहन करुन तसेच जीवन जगणाऱ्या माणसांना म. फुले यांनी त्यांच्यासाठी वाचा फोडली व प्रत्येक माणसामाणसात जागृकता निर्माण केली म्हणून हडसनकर म्हणतात,

> ''क्रांतीबा फुल्यांचे चैतन्य,
> माझ्या धमण्यांनी सळसळले,
> माझी ही निळीझेप,
> गढीला सुरुंग मीच इथे लावले....''[१६] पृ. क्र. १३

महात्मा फुले यांनी समाजात होणारा अन्याय सहन न करता त्यांनी अन्याय, अत्याचार करणाऱ्यावर आक्रमण केले व अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली. म्हणून कवीच्या प्रत्येक शरीरातील नसानसात महात्मा फुले यांचे विचार शिरले आहेत. त्यापासून कवीला प्रोत्साहन, प्रेरणा मिळाली म्हणून कवी आपल्या या लेखनीद्वारे पीडीत, शोषित दलित समाजाला जागे करण्याचा प्रयत्न करतो.

'बहिष्कार पचवून' या कवितेत समाज हा आहे. त्या परिस्थितीत राहिलेला नाही आता तो चालले आहे. जुन्या विचाराला गाडून नवीन विचाराच्या शोधात आहे.

आता येथून पुढे होणारा अन्याय, अत्याचार सहन करणार नाही म्हणून कवी हडसनकर म्हणतात,

"कणसा कणसात चैतन्य,
माझ्या घामाच्या साक्षीने ,
इंद्रधनुलाही बहाल रंग,
माझ्या गोधडीच्या नक्षीनं..
आता आलीया माझ्या,
मनगटात नवी रग,
उरात धगधगणारी,
बाळगून आहे सूर्यधग..." [१७] पृ. क्र. १८

ज्यावेळी पिकाला कणसे लागतात त्यावेळी त्यांच्यामध्ये जे चैतन्य निर्माण होते. कवी म्हणतो ते माझ्या घामाच्या साक्षीने कवीने ते कणसासाठी कष्ट, घाम, गाळलेला आहे. म्हणून कवी ठामपणे सांगतो, कवी थोडसं म्हणून थांबत नाहीतर आकाशात पाऊस पडल्यानंतर जो इंद्रधनू निर्माण होतो. त्या इंद्रधनूला माझ्या या गोधडीचीच नक्षी दिली गेलेली आहे.

कवी म्हणतो, आता माझे मनगठ बळकट झालेले आहे आणि माझ्या उरात धगधगणारी सूर्यधग आहे. आता मी येथे घेण्यासाठी आलो नाहीतर सर्व काही देण्यासाठीच आलो आहे, असेच या काव्यपंक्ती सांगून जातात याची साक्ष येते. येथे कवीने कणसं, इंद्रधनू, सूर्यधग इ. प्रतिमा वापरल्याचे दिसून येते.

"आपुल्याच दु:खावर" या कवितेत कष्ट करणाऱ्या माणसांचे जीवन निराश झालेले आहे. जीवनात त्यांना शून्यता वाटू लागली आहे. किती ही कष्ट केले तरी पोटाला कमीच पडत आहे म्हणून कवी त्यांना धीर देण्यासाठी म्हणतो,

आपुल्याच दु:खावर,
असं रसून कसं चालेल ?

आता उठलंच पाहिजे,

असं बसून कसं चालेल ?

घाम गाळण्याचा असा,

गड्या तुझा माझा वसा,

तो राबणारा पहा जथ्था,

त्यात नसून कसं चालेल ?'' [१८] पृ. क्र. ४०

कवी हडसनकर म्हणतात, कष्ट केले तरच पोटाला अन्न मिळेल म्हणून कष्ट करुनही जीवनात निराशा आहे. म्हणून कवी म्हणतो. आपण या आपुल्या दुखावर रुसू नये. आता आपण बसून न राहता कष्ट केलंच पाहिजे. होणारा अन्याय अत्याचाराला वाचा फोडलीच पाहिजे आणि तो एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे. येथे कवीने कष्टकरी जीवनाला प्रोत्साहन प्रेरणा दिलेली आहे. कष्ट करणाऱ्या लोकांच्या जीवनात अपयश किती ही आले तर यश नक्कीच तुमच्या पाठीशी आहे असेच या वरील काव्यपंक्तीतून स्पष्ट होते.

### ३)सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कविता :

कवी हडसनकर यांनी समाजातील कांही पुढाऱ्याबद्दल वागण्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. माणूस हा समाजापासून दूर चाललेला आहे. राजकीय परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नेता हा आपल्या समाजातील माणसाचा विचार न करता पुढे जात आहे म्हणून कवी म्हणतो,

बोधिवृक्षातळी, साऱ्यांनी एकी केली,

निळ्या झेंड्याला साक्षी ठेवून,

अन् बांधली एकीची मूठ, ......

मग .....

का बरे हा जथ्था पांगलेला ?

या खुळ्यांच्या कळपात

मी एक आशाळभूत

बेटे सारेच निर्ढावलेले

घरंदाज अन् तिरंदाज

सोयीच्या फांद्या निवडून

जो तो विसावलेला...[१९] पृ. क्र. १४

कवी म्हणतो, बोधि वृक्षाच्या झाडाखाली साऱ्यांनी एकत्र येऊन एकता निर्माण केली होती. आणि ती ही निळ्या झेंड्याला साक्षी ठेवून मग तरी पण हा समाजातील समूह का ऐकमेकांपासून दूर झाला आहे आणि या खुळ्यांच्या कळपात मी निराशावादी जीवन जगत आहे. आणि अशा निर्ढावलेल्या माणसापासून कवीला वीट आला आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीचा विचार न करता स्वार्थीपणाने आपल्याच समाजातील माणसे स्वःताच्या स्वार्थापोटी वेगवेगळ्या राजकीय गटात बसून विसावलेली आहेत. येथे कवीने समाजातील अशा लोकांना एकत्र येण्याचा सल्ला दिलेला दिसून येतो. कवीने येथे राजकीय परिस्थितीतील चित्रण केलेले दिसून येते.

'मुखवट्यांच्या बेगडी दुनियेत' या कवितेत कवी जीवन जगत असताना जीवनात निराश झाला आहे. त्याला माणसामध्ये माणुसकी राहिलेली नाही, असे वाटू लागले आहे. म्हणून कवी म्हणतो,

''मुखवट्यांच्या बेगडी दुनियेत,

अस्सल चेहरा घेऊन हिंडलो,

'माणूस' म्हणून माझी,

ओळख इथे पटलीच नाही....''[२०] पृ. क्र. १५

कवी म्हणतो, समाजामध्ये वागणारी माणसे खोटे जीवन जगत आहेत. परंतु कवी हा खरे जीवन जगत असतानाही त्याला हिन जीवनात घालणारे काही लोक आहेत. कवीच्या वाटयाला माणूसपणही नाहीच माणूस म्हणून त्याला माणसात किंमत ही नाही. म्हणून येथे भूतलावर आलो तरी माणूस म्हणून मला घेण्यास काही जाती-

धर्मातील लोक घेण्यास तयार नाहीत. म्हणून कवी म्हणतो, माणूस म्हणून माझे ओळख येथे पटलीच नाही. कवीने माणसा-माणसात समाजात किती वैर निर्माण झाले आहे. कवीने सांगितले आहे. येथे कवीने काव्यपंक्ती लिहिताना 'माणूस' हाच केंद्रबिंदू मानलेला आहे.

कवी हडसनकर म्हणतात, समाजामध्ये जुने दिवस राहिलेले नाहीत. आता माणसांचे जीवन आधुनिक पिढीमध्ये होत चाललेले आहे. म्हणून कवीने येथे एका म्हाताऱ्याचे मनोगत कवितेत व्यक्त करताना म्हटले आहे.

''अरे ... म्या पन खूष,
अन् मथारीय खुष,
खोटं वाटलं तर नाता,
तुझ्या आजीलाय पूस...
उभ्या जनमामधी,
नव्हता काढला फोटू,
बरं केलं सरकारनं,
आता शिरणीच वाटू...
आता आम्ही संगं मंगं,
करु दोघं मतदान,
गरीबाला तितकाच,
बाप्पा भेटतोरे मान,''[२१] पृ. क्र.२६

कवी म्हणतो, या आधुनिक युगामध्ये सतत बदल होत आहेत.त्यातच सरकारने ओळखपत्र हे सक्तीचं केले आहे. ओळख पत्राशिवाय मतदान करता येणार नाही. म्हणून सरकारने सर्व देशातील माणसाला ओळख पत्र फोटो काढून दिला, म्हणून एक म्हातारा, खूष झालेला आहे. तो नातवाला आनंदाने सांगतो म्हणतो, ''मी खूष आहे आणि माझी म्हातारीही खूष आहे, म्हातारा म्हणतो '' आता जरी आम्ही जोडीने

मतदान करायला जाऊ अशी त्याला आस आहे. उभ्या जन्मात कधी फोटो काढला नव्हता ,बरोबरीने तो आता योग आला आहे. म्हणून तो सरकारवर खूष आहे. समाजातील म्हाताऱ्या लोकांना किंमत नसते. परंतु मतदानाच्यावेळी म्हाताऱ्या लोकांना किंमत असते. येथे कवीने समाजातील म्हाताऱ्या माणसाच्या जीवनाची कैफियत मांडली आहे.

## ४)राजकीय जीवन जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता :

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी खेडेगावातील माणसे कशाप्रकारे जीवन जगत असतात. ते कोणकोणत्या संकटांना सामोरे जातात. खेडेगावातील हुशार पुढारी या भोळ्या भाबड्या जनतेला कसे फसवितात ते मतदानाच्यावेळी कसे गोरगरीब जनतेला आश्वासन देतात. निवडून आल्यानंतर चुकून ही त्यांच्याकडे फिरकत नाहीत. 'गावाचे गावपण तडकतांना' या कवितेत व्यक्त केले आहे. हे खालील काव्यपंक्तीवरुन दिसून येते,

''शमविता येत नाही,
त्यांनाही भूकेचा वणवा,
नुस्ती आश्वासनांची खैरात...
घोषणाच घोषणा सर्वत्र,
स्वातंत्र्याची सकाळ,
आलीच नाही आमच्या घरात...''[२२] पृ. क्र. १६

कवी म्हणतो, त्यांना गरीब लोकांची भूक भागविता येत नसेल तर कशाला आश्वासनं द्यावी म्हणून गावातील माणसाचे जीवन निराशा आहे. त्यांच्या दारी कोणतीची प्रगतीची योजना नाही. नुसती घोषणाच आहे म्हणून कवी म्हणतो, या गरीब लोकांच्या दारी कोणतीच विकासाची गंगा आलीच नाही. येथे कवीने खेड्यागावातील पुढारी कसे स्वार्थीपणाने वागत आहेत व गरीब लोकांचे कसे शोषण

करतात. कवीने येथे खेड्यागावातील वास्तव जीवन अनुभवल्यासह मांडले आहे. वरील काव्यपंक्तीतून दिसून येते.

'तू उत्तुंग भव्य भक्कम' या कवितेत कवी म्हणतो, जर नैसर्गिक आपत्ती आली तर किंवा एखादी दु:खद घटना घडली तर काही माणसे खोटे प्रायश्चित करतो. केवळ स्वार्थापोटी हे खालील काव्यपंक्तीवरुन दिसून येते.

''तसे सार्वजनिकरित्या
प्रायश्चिताचे जाहिरनामे,
मी घोषित केले,
तरी तडजोडीत, लालदिव्यासाठी,
कसा .. मांडूळ झालो....''[२३] पृ. क्र. १७

'मलाय माहीत अन् तुम्हालाय माहीत' या कवितेत कवी म्हणतो, राजकीय नेता निवडून आला तरी त्याला नंतर परत परत निवडणुकीत उभा रहावं असंच वाटत असते. सहजासहजी खुर्ची सोडण्यास तयार होत नसतो म्हणून कवी म्हणतो.

''पड पड पडून तरी, त्यानं किती पाया पडावं,
पडता पडता धन झालं.
त्यानं किती इलेक्शन लढावं ?
तरी गडी उभा राही, त्याला नाही तोड...
मंतात ना...''[२४] पृ. क्र. ५७

कवी म्हणतो, निवडणुकीच्या काळात राजकीय नेता सर्व माणसांना हात जोडत असतो. नंतर तो निवडूनही येतो. भ्रष्टाचार करुन पैसा ही मिळवितो. तरी ही त्याचं मन समाधानी होत नाही. तो अजून निवडून येतो व जनतेची फसवणूक करतो. असं सतत त्याचं चक्र फिरत असते. म्हणून कवी येथे या भोळ्या जनतेला अशा राजकीय नेत्यापासून सावध करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. हडसकरांनी वास्तव जीवनातील घडामोडी येथे स्पष्ट केल्या आहेत.

## ५) स्मृतीस उजाळा देणाऱ्या कविता :-

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी काही समाज सुधारकांच्या आठवणीला उजाळा देत असताना त्यांचे कर्तृत्वाचा ठसा कसा उमटविला आहे. काही कवितेच्या माध्यमातून त्यांनी सांगितले आहे. 'तुझ्या श्वासाला लाभे' या कवितेतून हडसनकरानी 'गौतम घाघमारे ' या हौतात्माच्या आठवणीस उजाळा दिला आहे. कवी म्हणतो,

"बापाचे नांव घेतच,
जगणे कैकांचे सूत्र,
बापाच्या नावासाठी,
मरणारा तूच पुत्र....
शहीद झालाय तूच,
नामातराच्यासाठी,
राजगृहापरी तूच,
वसला आमच्या ओठी,...."[२५] पृ. क्र. ९

गौतम वाघमारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यासाठी प्राणाचे बलिदान केले आहे. काही समाजातील माणसे आपल्या बापासाठी मरण पत्करतात. बापाचे नाव घेतच जगणे हे काहीजणांचे सूत्र असते. म्हणून कवी म्हणतो, तू या आपल्या बापाचे नाव देणयासाठीच तू मरणाला सामोरे गेलास. या राजगृहापरी तूच आहेस आणि सतत आमच्या या ओठामध्ये तुझच नांव आहे. असं कवी म्हणतो, येथे कवीने अतिशय चांगल्या प्रकारे गौतम वाघमारे या हुतात्मास श्रद्धांजली वाहिलेली आहे, असे दिसून येते.

'पहाट होण्याआधी' या कवितेत निसर्ग हा माणसाप्रमाणे मानवावर कसा अन्याय, अत्याचार करतो व त्यातून तो कसा माणसांचे बळी घेतो. परंतू या नैसर्गिक अन्यायाला कोणीच रोखू शकत नाही. त्यास वाचा फोडू शकत नाही. म्हणून कवी म्हणतो,

'पहाट होण्याआधी,

काळाने टाकला डाव,

उध्वस्त बेचिराग,

क्षणात गाव अन गाव...

हा . हा. कार सर्वत्र,

जीवाचा थर काप,

लेकरांसह चिरडले

मायेचेही मायबाप.... '[२६] पृ. क्र.,२७

कवी म्हणतो, येथे निसर्गाने माणसे झोपेत असतानाच त्यांच्यावर झडप टाकली आहे. पहाट होण्याआधीच हल्ला केलेला आहे. आणि एका क्षणात उद्धस्त बेचिराग असा गांव केला आहे. त्यामुळे सर्वत्र जीवाचा थरकाप उडलेला आहे आणि काही ठिकाणी आई-वडिलांसह लहान लहान मुलेही घरांच्या भिंती अंगावर पडून चिरडली गेलेली आहेत. येथे कवीने ३० सप्टेंबर १९९३ या सालातील किल्लारी भूकंपाची आठवणी करुन दिलेली आहे. कवीने या वरील काव्यपंक्तीतून त्या दिवसाची भयानकता स्पष्ट करुन, निसर्गाच्या कोपाची आठवण करुन वाचलेल्या बालकांना दिर्घआयुष्य चिंतले आहे.

'सावळं स्वप्न' या कवितेतून कवी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेत्री स्मीता पाटील हिच्या काही आठवणींना उजाळा देत असताना तिची कारकिर्द कशी बहरत गेली यांचे वर्णन करताना म्हणतात,

''तुझा श्वास मंथनाचा,

तुझा ध्यास चिंतनाचा, ..

तुझं स्मित कैक मोनालिसांना,

स्तंभित करणारं

स्मिता, तुझं स्मित कधीही न पुरणारं

पुरुनही उरणारं....''[२७] पृ. क्र. २९

**६) बदलत्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या कविता :**

कवी रविचन्द्र हडसनकरांनी आधुनिक खेडेगांव व आणि पूर्वीचे खेडेगाव यात किती बदल झाला आहे. सांगत असताना कवी म्हणतो, पुर्वी खेडेगाव सुजलम्, सफलम् असे खेडे होते, सर्वत्र हिरवळ, एकमेकांपासून दुरावलेल्या माणसांची विचारपूस करत होते. पण आता तसे काहीच राहिले नाही. म्हणून कवी 'मायाच्यान बा, खरंच सांगतोय' या कवितेत कवी म्हणतो,

''मायाच्यान बा, खरंच सांगतोय,
गाव पाहिल्यासारखं राह्यलं नाही:.
पूर्वीची माया नाही.
झाडांची छाया नाही.
उदास झोपड्या,
भकास शवपरेल घरं,
मनं उणगलेली,
माणुसकीची सुगी नाही....''[२८] पृ. क्र. ४१

कवी म्हणतो, पूर्वी जशी माया होती तशी आता माया राहिली नाही. ज्या झाडाच्या सावलीखाली आम्ही खेळत होतो. त्या झाडाची सावलीही राहिलेली नाही. प्रत्येक झोपडीही उदास वाटत आहे. खपराची घरे ही उदास वाटत आहेत. माणसांची मने ऐकमेकांपासून विटलेली आहेत. एकमेकांत द्वेष निर्माण झाला आहे. माणुसकीच गावात राहिलेली नाही. असे कवीला वाटू लागले आहे. येथे कवीने वास्तव जीवनावर भाष्य केल्याचे दिसून येते. आधुनिक खेडेगाव असेच होत चालले आहे. अशा या वरील काव्यपंक्ती सांगतात.

'माणसांची नुस्ती भरती, मंग गाव का वसाड ' या कवितेत कवी म्हणतो, पूर्वी गाव लहान होते तशी गावाची ही लोकसंख्या कमी होती. या गावात माणुसकी

बघायला मिळत होती. आणि सर्व ठिकाणी आनंदमय वातावरण होते. माणसे गुण्या-गोविंदाने जगत होती. परंतु आता तसे राहिले नाही. म्हणून कवी म्हणतो,

''माणसांची नुस्ती भरती, मंग गाव का वसाड,
माणुसकीच आटली, झालं कोरडठंन वताड..
चिरेबंदी वाड्यावर, दुभती हाय मसाड,
पाची बोटं तूपामधी, शिरामंती खसाड...
नवं पीक नवं खत, बोरवेलचं इऱ्हाड,
गानं बुडलं मोटचं, मोडून गेलं बगाल...''[२९] पृ. क्र ३६

कवी म्हणतो, गावामध्ये सर्वत्र माणसेच माणसे आहेत. तरी पण गाव फुलून असं दिसत नाही. तर ओसड असं भासत आहे. कारण गावातील माणुसकी नष्ट झाल्यामुळे असं कवीला वाटत आहे. कवीला चिरबंदी वाड्यावर दुभती जनावरेही असुन नसल्यासारखे वाटत आहेत. मोट वडताना जे गीत गात होते ते ही मोटचं गाणं ही नष्ट झाले आहे. म्हणून कवी या गावावर नाराजी व्यक्त करतो येथे कवीने खेडेगावात किती परिवर्तन झाले आहे. हे वरील काव्यपंक्तीतून वर्णन केले आहे.

## २) 'सूर्यझेप आणि तळगर्भ' काव्यसंग्रहातील आशय :

**प्रास्ताविक :**

मागील प्रकरणात रविचन्द्र हडसनकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करुन घेतल्यानंतर त्यांच्या काव्य. लेखानाला मिळालेल्या प्रेरणा व त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली लक्ष्यात येते. प्रस्तूत प्रकरणात हडसनकरांच्या 'सूर्य झेप आणि तळगर्भ' या काव्यसंग्रहातील आशयाच्या स्वरुपाचा विचार करावयाचा आहे.

'सूर्यझेप आणि तळगर्भ' आघाडीच्या दलित कवीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या रविचन्द्र हडसनकर यांचा काव्यसंग्रह असून हडसनकरांनी स्त्री जीवनाला केंद्रस्थानी ठेवून, वैविध्य पूर्णतेने स्त्री जीवनाचे बारकावे आपल्या काव्यसंग्रहात टिपले आहेत. या काव्य संग्रहातील आशय व रेखाटन याची एकरुपता बेमालुमपणे साधण्यात कवी यशस्वी झाल्याची जाणीव काव्यसंग्रह वाचणाऱ्या, वाचकाला झाल्याशिवाय राहत नाही. ना. धो. महानोर म्हणतात, ''छोटेखानीच पण आशयगर्भ कविता व आशयानुरुप सुंदर रेखाटनांमुळे संग्रह आकर्षक झाला आहे.''[३०] पृ. क्र. ५

आधुनिक समाजात सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा, शैक्षणिक सुधारणा मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. याच काळात स्त्रियांच्याही जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल झाला आहे. या स्त्री जीवनाच्या बदलांना रविचन्द्र हडसनकरांनी आपल्या भाषा शैलीच्या जोरावर हडसनकरांनी ग्रामीण भागातील स्त्रीया, भटकंती करुन जगणाऱ्या स्त्रिया यांच्याही जीवनावर प्रकाश टाकण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्याचे या काव्यसंग्रहात जाणवते. तसेच हडसनकरांनी स्त्री जीवनाची व्यथा मांडणारे, अस्वस्थ करणारे काही प्रश्नही या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने अधोरेखित केले आहेत. रविचन्द्र हडसनकरांच्या एकूणच चित्रणाबाबत व भाषेबाबत बोलत असताना किंवा सांगत असताना ना. धो. महानोर म्हणतात, ''अबलांची सबला झालेली कहाणी रविचन्द्र हडसनकर आपल्यासमोर या कविता संग्रहाच्या निमित्ताने सांगतात.''[३१]

रविचन्द्र हडसनकरांनी अतिशय साध्या सरळ सोप्या भाषेचा वापर केल्याने कवितेच्या आशयाला एक वेगळेच सौंदर्य लाभले आहे. कवीने अनेक प्रतिमा, प्रतिकांचा वापर काव्य लेखनासाठी करुन आशयाला प्रभावीपणे चित्रित केले आहे. तसेच या त्या-त्या कवितेला आशय अतिशय बोलक्या स्वरुपात व्यक्त झाला आहे.

विशेषत: स्त्रियांसाठी लिहिलेल्या या लहानशा कविता संग्रहामध्ये स्त्री जीवनातील वैविध्य चित्रित करणाऱ्या अनेक कविता आहेत. या कवितांचे त्यांच्या आशयानुसार वर्गीकरण करुन अभ्यास करणे सोपे होईल. प्रस्तूत प्रकणरात रविचन्द्र हडसनकरांच्या 'सूर्यझेप आणि तळगर्भ' या काव्यसंग्रहातील कवितांचा आशय पुढीलप्रमाणे पाहता येईल.

मराठी दलित कवितेच्या प्रातांत स्त्री जीवनावर अनेक अंगाने लिहिले आहे. कथा, कादंबरी, नाटक, कविता या वाड्:मय प्रकारातून दलित उपेक्षित स्त्रियांचे चित्रण येते. तसेच एक स्त्री म्हणून तिचे चित्रण हिरा बनसोडे, उर्मिला पवार, प्रज्ञा लोखंडे, बेबी कांबळे, मलिका अमर शेख, ज्योती लांजेवार इ. कवयित्री, लेखिकेने केले आहे. काही पुरुष लेखक मंडळीनी स्त्रियांच्यावर लिखाण केले आहे. त्यात समीक्षापद्धतीने डॉ. सुनिल चंदनशिवे यांचे 'दलित साहित्यातील स्त्रीचित्रणं' ह्या ग्रंथातील सर्व वाड्:मय प्रकारातून व्यक्त होणारी स्त्री स्पष्ट केली आहे. याच धरतीवर कवितेचा प्रातांत अत्यंत तळमळीने आदरभाव व्यक्त करुन कधी तिच्या कर्तृत्वाच्या भराऱ्या तर कधी तिचे दु:ख चित्रित केले आहे. तर कधी तिच्या स्वभावाची विविध रुपये चित्रित केली आहेत.

## १) स्त्री जीवनाच्या कर्तृत्वाची भरारी :

रविचन्द्र हडसनकरांनी आपल्या काव्यसंग्रहात स्त्री जीवनाच्या बदलाचा आढावा घेतला आहे, 'चुल आणि मूल' या परंपरेत जगणारी स्त्री आधुनिक समाजात पुरुषाच्या बरोबरीने वागू लागली. जुन्या रुढी परंपरा यांना छेद देऊन मी आधुनिकतेचा स्वीकार करु लागली. याचे चित्र रेखाटताना हडसनकर म्हणतात,

''वायफळ ना जाणारी,

ती वायपन्याची माती,

रुढी भंजना, माय अंजना,

निधडी, जयवंताची छाती...

कोण कुणाचे कुठले ?

निरर्थक नाती जाती,

ती सूर्य झेप घेताना

निजसुखा मूठमाती''[३२] पृ. क्र. १२

आधुनिक समाजातील स्त्री सुधारल्याने तिच्या जीवनात आमूलाग्र बदल झाल्याचे सुतोवाच करताना हडसनकर तिच्या या बदलाला सूर्यझेपेची उपमा देतात. तसेच पुढे परंपरेच्या रेट्याखाली भोगलेले जीवन विसरुन, सूर्यभरारी घेण्याची उर्मी स्त्रीच्या मनात निर्माण झाल्याचे सांगाताना, रविचन्द्र हडसनकर म्हणतात,

''जे जे भोगले, किती घोगले,

रंध्रा रंध्रात, मळमळती,

दिठी करारी, सळसळती,

दंडेलीच्या दंडुक्याला,

कळते त्यांना, जे जळती

म्हणून झाली, तू धगधगती....''[३३] पृ.१३

स्त्रीने अन्याय अत्याचार सोसल्यामुळेच आधुनिक समाजात होणाऱ्या अत्याचाराला प्रतिकार करण्याची ताकत तिच्यात आगेतील धगीप्रमाणे उपाळून आली. या काव्यपंक्तीवरुन असे दिसून येते की, आधुनिक स्त्री ही धाडसी झालेली आहे. तिच्या अंगी धीटपणा प्राप्त झाले आहे.

'फलश्रूती' या कवितेतून स्त्रीपुढे उभारलेल्या प्रश्नाला स्त्री न डगमगता, कशी सामोरे गेली व त्या प्रश्नांना तिने कसे सोडविले याचे चित्रण अतिशय बोलक्या शब्दांत व्यक्त झाले आहे ते पुढीलप्रमाणे..

''पराजयातून,
खोदून खोदून
विजयश्री कशी खेचावी ?
परिश्रमाच्या फलश्रूर्तीची,
फुले कशी वेचावी ..!''
हे प्रश्नांकित कोडे ?
तू सोडविले लिलया,
तू केली ऐसी किमया,
भले भले अचंबित झाले,
उंचावित भूवया.....
की.... दौडत होते, तुझ्या धमणीतून
ते जयवंत असे घोडे......[३४]'' पृ.१४

तर 'पोहे' आणि 'सातबारा' या कवितातून स्त्रियांना प्रगतीच्या वाटेने जाताना किती संकटे आली त्यांची किती दमछाक झाली तरी ही त्यानी न डगमगता यशाची कास सोडलीच नाही. याचे वर्णन करताना कवी म्हणतात,

असंख्य गतिरोधकांना,
तू कसे केलेस पार....
हडसनच्या उपासागरापरी
उघडलेस तू 'सुर्य नगरील'
प्रगतीचे द्वार....[३५]'' पृ.१६

कवी म्हणतो तू समाजाचा विकास करीत असताना तुझ्यासमोर किती संकटे आली तरी तू धैर्याने ती पार केलीस. इंग्रजी संस्कृतीला न जुमानता एतदेशीय संस्कृती स्वीकारून तू प्रगती पथावर गेलीस.

''श्रमली श्रमली,

तरी न दमली,

तु तुझाच झाली

अढळ ध्रुवतारा ''[३६] (पृ.१७)

कवी स्त्रीच्या श्रमाला ध्रुवताऱ्याची उपमा देताना दिसतो. ध्रुवतारा जसा अढळपणे निष्ठत आहे. त्याचे काम तो नित्य नियमाने करतो. तशीच स्त्री काम करते.

## २) स्त्रीत्वाला प्रेरणा देणारी कविता :-

रविचन्द्र हडसनकरांनी 'सूर्यझेप आणि तळगर्भ' हा काव्यसंग्रह मुळात रयतेसाठी लढणाऱ्या झुंजार प्रणेत्या सुर्यकांता पाटील यांना अर्पण केला आहे. स्त्री जीवनात झालेल्या बदलाचा आढावा तर हडसनकर घेतातच पण काही कवितांतून स्त्रीजीवनाला प्रेरणा देणारा हा आशय व्यक्त करतात. तिची मार्मिकता स्पष्ट करताना हडसनकर म्हणतात,

'' श्वास असा पेरीत जा,

पेरण्याचा तुझा वसा.....!

उगवण निगवण

हृदयी हा तुझा ठसा....[३७]'' पृ.२१

स्त्री जीवनाला असणारी परंपरा इतिहासाची पाने चाळल्यानंतर आजही दिसून येते. आजच्या स्त्रीचा इतिहास लिहिला जाईल. समाजात चर्चिली जाईल हे सांगत असताना रविचन्द्र हडसनकर 'गाणे' या कवितेत म्हणतात,

'' रुधिराक्षरांनी,

शिंपडलेली,

इतिहासाची पाने........!

उद्या चाळतील,

अन मुखी घोळतील,

सुर्यकुळाचे गाणे.....[३८]'' पृ.२२

त्याचबरोबर 'अपेक्षा' या आपल्या कवितेतून कवी स्त्रीला तिच्या इतिहासाची जाणीव करुन देत पुन्हा एकदा नव्याने या समाजातील रंजल्या गांजल्यासाठी तू संग्राम लढावा अशी अपेक्षा व्यक्त करताना दिसतो तो असा.

'' पुन्हा नव्याने,

नव्या दमाने,

तू लढावा संग्राम,

रंजले गांजले,

अंधश्रध्देत गंजले,

त्यांच्यासाठी,

तू हो कानस,

हीच अपेक्षा,

नको उपेक्षा,

वदे हर एक ग्राम........[३९]'' पृ.३३

कवी हडसनकर स्त्रियांना आधुनिक विचारांची बनविता आपले दुबळेपण घालवून नव्या युगाचे भान ठेवून, पुरुषाच्या बरोबरीने बदलाच्या लढाईच्या संग्रामात उतरविण्यास सुचवितात. समाजामध्ये गरिबीने रंजलेली गांजलेली माणसे आहेत त्यांचा उध्दार करण्यासाठी तू तयार हो. अंधश्रध्देत गुरफटलेले आहेत. देवमाणसात न शोधता दगडात शोधतात. अंधश्रध्देपोटी पशुहत्या करतात त्यांना चांगला मार्ग दाखवण्यासाठी स्त्रीने सबला होण्याची रविचन्द्र हडसनकरांची अपेक्षा आहे आणि पुढे ते म्हणतात, ये-पण 'कानस' म्हणूनच ये कवीने 'कानस' हा शब्द का घेतला कारण

एखाद्या लोखंडी हत्याराला धार नसेल तर कानस त्यांच्यावर फिरविली जाते. त्यावेळी त्या हत्याराला धार येते. म्हणून या माणसाच्या विकासाची तूच 'कानस' आहे असे कवीला वाटते. म्हणून येथे कवीने 'कानस' ही प्रतिमा वापरल्याचे दिसून येते.

### ३) राजकारणातील स्त्रियांचे कर्तृत्व स्पष्ट करणाऱ्या कविता :-

स्त्रीयांनी राजकारणात केलेला प्रवेश त्यांनी राजकारणात केलेले स्वतःचे स्थान याचा ही वेध हडसनकरांची कवितेतून घेतला आहे. त्यांनी आपल्या 'छडा' आणि 'विकासगंगा' या कवितातून स्त्री विधान भवनापर्यंत पोहचल्यामुळे रयेतेचे दुःख तिला कसे उमजले. तसेच तिच्या प्रयत्नातूनच विकासाची गंगा दारा-दारापर्यंत कशी पोहोचली याचे वैशिष्ठ्यपूर्ण चित्रण या कविता करताना दिसतात. या दोन्ही कवितेच्या पुढील काव्यपंक्तीतून त्याचा प्रत्यय येतो.

" विधान भवनी
होवून रागिणी
लाविला छडा,
तुलाच कळला,
रयतेच्या ह्या,
दुःखाचा खडाखडा...."[४०] पृ.२४

हडसनकर म्हणतात, जेव्हा तू विधानसभेत गेली. त्यावेळी मुख्य तू एकच गोष्ट लक्षात ठेवली. ती म्हणजे जनतेचे सुख -दुःख या शेतकऱ्याचे दुःख संकटाचा मार्ग तुच मोकळा केलास, असे कवीला वाटते. या शेतकरी जनतेच्या अडीअडचणी तूच समजू शकते. त्यातून तूच मार्ग काढतेस असे कवी म्हणतो. पुढे कवी म्हणतो.

" लोकसभेतही,
रयतेसाठी,
तू बोलती झाली,
विकास गंगा,

आमुच्या दारी,

झुळू, झुळू,

वहात आली......'' [४१] पृ. २५

त्याचबरोबर त्यांच्या 'ऋचा व गुढी' या कवितातूनही हडसनकरांनी स्त्रीने राजकीय सत्तेची सुत्रे आपल्या हातात घेतल्यानंतर कशा प्रकारचा बदल घडवून आणला याचे चित्र शब्दबध्द केले आहे.

'राज्यसभेच्या,

सभागृहातही,

तू झाली,

आमची वाचा,

हृदयाचा हा,

बांध फुटतो

ती अन्य कोणती ऋचा ''[४२] पृ.२६

'ऋचा' या कवितेतून राज्यसभेत सर्वसामान्याचे प्रतिनिधीत्व करणारी स्त्री सर्वसामान्याची वाचा होऊन तिथे गेली आणि तिने समाजातील दु:ख, व्यथा, वेदनांना चाहोट्यावर मांडण्याचे प्रमुख कार्य केले. असेच या काव्यपंक्ती सांगतात असे वाटते. तर 'गुढी' या कवितेतून स्त्रीने राजकिय सत्तेच्या अधिकारातून सुधारणेची जणू काही गुढीच उभी केली आहे. अशी जाणीव होत राहते. सरकारच्या मदतीने तू सर्वांनाच रोजी रोटी उभी करुन दिलीस आम्ही सदैव तुझ्या ऋणातच राहु. तसेच 'स्त्री' ने केलेल्या कामाची दखल म्हणजे जणू काही दुग्धशर्करेचा योगच वाटावा असा आहे. त्याचबरोबर तू आमची लोक प्रतिनधी व लोककल्याणी झाल्याने आमच्या मळ्यांनी जणू काही हिरवे गर्द लेणेच परिधान केले आहे असे वाटते.

### ४) स्त्री जीवनातील बदल चित्रित करणाऱ्या कविता :-

हडसनकरांनी आपल्या शब्दांची ओंजळ स्त्रीच्या बदलत्या जीवनाला वाहिलेली आहे. स्त्री काय होती ? आणि काय झाली, त्यांच्या प्रगतीचा वृतांत हडसकरांची कविता मांडताना दिसते. आपल्या पारंपारिक जीवनाची कात टाकून आधुनिक जीवनात स्त्रीने बदलाचा वसा घेतला आहे. या बदलाला अंगिकारताना तिला अनेक चढउतारांना सामोरे जावे लागले आहे. तसेच आधुनिकतेचा स्वीकार करुन तिने कशाप्रकारे यशाची भरारी घेतली हे हडसनकरांच्या 'ओंजळ' या कवितेतील प्रतिमा, प्रतिकांच्या माध्यमातून प्रत्ययास येते. या बदलाला शब्द बध्द करताना हडसनकर म्हणतात,

''काल कंठ दाटलेला,<br>
आज श्वास मोकळा,<br>
आत्म तेजी फुलली,<br>
रोम रोमी नवी कळा...''

'' तुझी मी प्रगतरुपे,<br>
माझ्यातच मी पाहतो,<br>
शब्दांची ही ओंजळ,<br>
मी जाता येता वाहतो..''[४३] पृ.२९

आधुनिक समाजातील स्त्री रुढी परंपरांच्या साखळ दंडातून मुक्त होऊन समाजातील दांभिकतेवर आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर तिने काळावरही आपले नांव कोरले. आपल्या आगम्य इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाने तिने येणाऱ्या प्रत्येक संकटावर आपल्या कर्तृत्वाची मुद्राच उमटविली. अशा या स्त्रीच्या बदलाचा सांगोपांग विचार हडसनकरांची कविता करताना दिसते. अशाच आशयाला जवळ जाणारी कविता म्हणून त्यांच्या 'मुद्रा' या कवितेचा उल्लेख करता येईल.

" अमोघ कर्तृत्व साक्षीनं,

काळाच्याही छाताडावर,

तूच कोरीली 'मुद्रा'

अक्षर हे किती अक्षय,

हे कुठले अभय,

तू घेवून आलीस,

लोपवावया अभद्रा" [४४] पृ.३०

अशाप्रकारे 'मुद्रा' या कवितेत हडसनकर या मानवी समाज जीवनात जो अन्याय अत्याचार मानला आहे. त्याचा नायनाट करण्यासाठी स्त्रीने अमोघ अशा कर्तृत्व शक्तीचा चेहरा परिधान केला आहे व ती काळाच्या छाताडावर बसून या अभ्रदांचा नाश करावया सज्ज झाली आहे. स्त्रीने आपल्या प्रगतीचा आलेख नेहमी चढताच ठेवला येणाऱ्या अनेक समस्यांना संकटांना ती ताठपणाने सामोरे गेली. आपल्या देहाचे पावित्र्य राखता राखताच तिने आयुष्याशी झुंज दिली. तिने आपल्यातील शक्तीची जाणीव ओळखून नियतीच्या ज्वालांनाही स्वकर्तृत्वावर राख केली. अशा या स्त्रीच्या बदलाचा आढावा घेताना हडसनकरांचे शब्द अतिशय बोलके होताना दिसतात. हडसनकर आपल्या 'पासोडी' या कवितेतून स्त्री बदलाची जाणीव व्यक्त करताना म्हणतात.

"देहाची पासोडी,

शुध्द करता करता,

युध्द आयुष्याचे,

हे लढता लढता,

तुलाच कळले,

आलेख ठेवावा,

कसा चढता, चढता......" [४५] पृ.३१

वरील कवितेत स्त्रीने आयुष्याशी दिलेला लढा तसेच येणाऱ्या संकटावर स्वार होऊन आपल्या प्रगतीचा चढता आलेख ठेवलेला आहे. त्याचबरोबर स्त्रीला अस्तित्वाची जाणीव आणि तिने ओळखलेली स्वत:ची क्षमता पाहून हडसनकरांनी 'धन्य अढळ तुझी दृढता' असे विचार व्यक्त केले आहेत.

हडसनकरांची 'देठातून' ही कविता स्त्रीच्या बदलासाठी जनतासुध्दा कशाप्रकारे साक्ष देते. हेच सांगून जाते. स्त्रीच्या या बदलाचे शब्दात चित्रण करताना हडसनकर म्हणतात.

"तुझे अंत:स्फोट,
बेबीच्या देठातून,
दुथडी वाहती,
रयतेच्या ओठातून,
तुझ्या कणवेचा दरवळे
सुगंध गाभारी पेठापेठांतून...."[४६] पृ. ३२

हडसनकरांच्या वरील काही कविता पाहिल्यानंतर या कवितेतून येणाऱ्या आशयाचा प्रत्यय वाचकांना समाजात वावरत असताना स्त्रीच्या प्रगतीकडे पाहिल्यानंतर आल्याशिवाय राहणार नाही. असं मला वाटते. तसेच या बदलत्या स्त्रीच्या स्वरुपाकडे पाहताना ना. धो. महानोर म्हणतात, "विकास व परिवर्तनाचा नवा विचार घेऊन जाणाऱ्या स्त्रीयांना अंगावर थुंकी आली तरी शांतपणान ती पचवून आपआपल्या परिधात अव्यहत कार्य करण्याची जिद्द असते."[४७] पृ.६ म्हणजेच स्त्री जीवन जगत असताना अनेक वेळा समजूतदारपणाची भूमिका घेते. अन्याय, अत्याचार सहन करणे पण आता ती बदलत आहे ती सशक्त झाली आहे.

## ५) स्त्री जीवनाचा गौरव व्यक्त करणाऱ्या कविता :-

हडसनकरांनी स्त्री जीवनाच्या बदलाचा आढावा घेतघेतच स्त्रीने केलेल्या कार्याच्या व तिच्या हातून होणाऱ्या कार्याचा विश्वास व्यक्त करताना स्त्रीच्या 'गौरवाची गाथा' ही आपल्या काही कवितातून गायली आहे.

हडसनकरांनी 'विश्वास' या कवितेत स्त्रीने समाजासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेताना स्त्री भविष्यात ही अंतिम श्वासापर्यंत आमच्यासाठी लढत राहिल अशा विश्वास व्यक्त केला आहे. या विश्वासाची यथार्थता पटवून देण्यासाठी 'काळ्या दगडावरची रेखा' अशी प्रतिमा वापरुन स्त्री विषयीच्या विश्वासाला गडद गहिरे रंग भरले आहेत. स्त्री विषयीचा विश्वास व्यक्त करताना कवीचे शब्द म्हणतात,

" आमच्यासाठी तू,
लढतच राहशील,
असेल जोवर
अंतिम तो श्वास,
आमुच्या उरात,
काळ्या दगडाची रेखा
असा दृढ एकजीव विश्वास....!"[४८] पृ. ३६

त्याचबरोबर कवीने ऋतु मानवी जीवनात जसे बदल घडवितात तसेच ऋतु होऊन स्त्रीने मानवी जीवनात कशा प्रकारची सुख समृध्दी निर्माण केली आहे. 'ऋतु' या कवितेतून सांगितले आहे. स्त्रीच्या या ऋतु रुपाचे वर्णन करताना म्हणतात,

" तू आमुचा ऋतु,
जीव ओतू ओतू, मळ्या, लळ्यात,
तुझाच संसार......!
कृषि वल्लभा,
नवीच अभा,

भाग्य सौरभ,

सुखात संसार......''![४९] पृ.३७

कवी म्हणतो, स्त्रीच्या कर्तृत्वाने आमच्या मळ्यात तळ्यात मोती फुलले आमचे भाग्य उदयास आले. अनेकांचे संसार सुखात, आनंदात आहेत याचे चित्रण केलेले आहे.

स्त्री मानवी समाजाला कशाप्रकारे प्रोत्साहन देते तसेच मानवाच्या सुखदु:खांना कसे हालके करते याचे चित्रण हडसनकरांनी 'पारणे' या कवितेतून साकार केले आहे. स्त्रीने दिलेल्या आत्मविश्वासामुळे पिढ्यान पिढ्याचे दु:ख कमी झाल्यामुळे या स्त्रीचे स्वागत दारोदारी गुढ्या उभारून, तोरणे बांधून करावे असेच कवी सुचवितो. स्त्रीमुळे सुखाची बरसात झाली व दु:खाच्या पाण्याचे मोती झाले असे कवी सांगतो.

''स्वाती सम तू बरसशील,

हीच आस होती,

तू आलीस......

पापण्याची थेंबाचे

झाले मोती.......''[५०] पृ. ३८

स्त्रीने स्वत:बरोबर समाजातील सर्व स्तरात आमुलाग्र बदल केला हा बदल करीत असताना तिला अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. तरीही ती डगमगली नाही. सुखाची पहाट उगवेलच या आशेवर तिने प्रयत्नांची कास सोडली नाही. या स्त्रीच्या प्रयत्नांचा गौरव करताना हडसनकरांची लेखणी, प्रतिमा, प्रतिकांतून, माध्यमातून फुलत जाते ती अशी -

'' बहरून आले आज

टिप्पूर शरदीय चांदणे.....!

पडझडीच्या लेण्यात,

खांबा खांबात,

रत्नजडीत कोंदणे....!

त्यासाठी तू किती

पचविल्या,

अन रिचविल्या असतील

अमावस्या.....!"[५१] पृ.३९

परिशिष्टातील दुसरी कविता मानवी जीवनात प्राजक्ताचे सडे पडले. इंद्रधनुची रांगोळी घातली आमचे स्वप्न पूर्ती झाली म्हणून कवी म्हणतो.

" आता.....दारी अंगणी,

प्राजक्तांचे सडे......!

इंद्रधनुची रांगोळी,

आमच्या स्वप्नपूर्ती साफल्याचे

प्रतिबिंब त्यात पडे........![५२] पृ.४०

तिने समाजासाठी केलेल्या प्रयत्नांची कास धरून आकाशात गगन भरारी घेतली हे सांगत असताना तिने आपल्या मातृत्वाची प्रेरणा समाजात कशी पेरली त्याचबरोबर तिने आपल्या मायेच्या पंखाचे बळ पांघरुन सर्वांवर कसे धरले हे सांगत असताना कवी म्हणतात,

" तुझ्या जीवावर,

आमुची गगन भरारी,

बाणा करारी,

घासातील घास,

नवा श्वास देत गेलीस...!

आत्म कठोर होऊन ही

पंखाखाली घेत गेलीस......!"[५३] पृ.४०

## ६) स्त्री जीवनातील कर्तृत्वाचा शेतकरी जीवनावर झालेला परिणाम :-

हडसनकरांनी 'सूर्यझेप' आणि 'तळगर्भ' या काव्यसंग्रहात स्त्री जीवनाच्या कर्तृत्वाचा दोन टप्प्यात आढावा घेतला आहे. ह्यातील 'सूर्यझेप' या टप्प्यातील परिशिष्टात कवीने स्त्रीयांच्या कर्तृत्वाच्या जीवनाचा शेतकरी समाजावरही परिणाम होऊन शेतकऱ्याचे जीवन फुलत गेले. याचे चित्रण केले आहे. या कवितेतील शेतकरी त्याच्या जीवनात झालेली प्रगती स्त्रीमुळेच झाली. याबद्दल विश्वास कवीने व्यक्त केला आहे.

" ही मायेची पाखर,
आता आमचे शेत,
तुझा नांगर वरवर,
आमची खिल्लारे,
गुरे वासरे गाई,
तुझा आखर...![५४] पृ. ४१

तर दुसऱ्या अशाच कवितेत सदैव भूक उपासमार अशी ओरड करणाऱ्या समाजात स्त्रियांनी आपल्या अपार कर्तृत्वाने बदल केला आहे. त्याचबरोबर तिच्या या कामगिरीने 'दसरा' दिवाळीला भुकेलेला समाज आज तिच्याच कर्तृत्वावर दसऱ्याचं सोनं लुटू लागला. दिवाळीला ज्योती, ज्योतीतून पेटू लागला स्त्री ही मानवी जीवनात किती महत्त्वाची भूमिका निभावते याचे चित्रण येते.

"धडपड दर दिसाची,
लागवड तर उसाची,
दारे धरतांना किती चरे
नवे वारे अंगी संचरे ...!
दसऱ्याचं सोनं लुटू,
बळीचं राज येण्यासाठी,

दिवाळीला,

ज्योती ज्योतीतून पेटू

आकाश दिव्यादिव्यातून भेटू ...''[५५] पृ. क्र. ११

रविचन्द्र हडसनकरांनी स्त्रीचा प्रगतीपथाच्या जीवनचा आलेख चित्रित केला आहे. ऐकीकडे यशाची भरारी घेणारी 'स्त्री' 'सूर्यझेप' या शीर्षकाखाली चित्रित केली आहे. तर दुसरीकडे 'तळगर्भ' या मथळ्याखाली अजूनही तळागाळात खितपत पडलेली ग्रामीण जीनवाला कवटाळून समस्या भोग, यातना, सहन करणारी स्त्री ही रेखाटली आहे. हडसनकरांनी स्त्री-जीवनाची होणारी ससेहोलपठही चित्रित केली आहे.

## ७) स्त्री जीवनाची होरपळ स्पष्ट करणाऱ्या कविता :-

हडसनकरांनी स्त्री जीवनाच्या बदलाला प्रतिबिंबीत करीत असतानाच तिला समाजातील रुढी, परंपरांच्या अनुषगांने येणारी दु:खे कशाप्रकारे सहन करावी लागतात. याचे चित्रण हबरंडा या कवितेत केले आहे. 'हंबरडा' या कवितेत कवी म्हणतात,

कन्यादानाच्या पवित्र्याला,

कुणी कलंकित केले ?

हुंड्याच्या हुंडीवरती,

हुंडी बाग का डंखीत गेले ?

हे भोग नगरीच्या माथी,

कुठवर रचती कोणी....!

ते टपलेले लुटारु

लुटती शिलाची गोणी.... !''[५६] पृ. क्र. ४५

वरील काव्यपंक्तीतून कवींनी 'कन्यादान' हे एक पवित्रदान होते. पण हुंड्याच्या राक्षसाने त्याला कलंकित केले, त्यामुळे समाजात स्त्रियांच्या वाट्याला अनेक भोग आले असे. कवी म्हणतात, तसेच हुंड्याच्या नावाखाली स्त्री जीवनाला लुटणारे

लुटारुच या समाजात मोठ्या प्रमाणात दिसत आहेत, असे कवी म्हणतात. तर हडसनकर पुढील ओळीतून अशा या स्त्रीच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम करतात,

''अन्याय जाहला त्याचे,
का मागतात पुरावे, .... ?
मग दाद कुठे मागावी,
अंतरी किती झुरावे,!
आता झुरणे झुगार गं,
प्रतिकारी हात उगार ग ...'' [५७] पृ. क्र. ४५

कवी म्हणतो, अन्याय झालेली स्त्री अन्याय, अत्याचाराच्या दु:खाने विवळत 'हंबरडा' फोडते. तिच्यावर झालेल्या अन्याय, अत्याचाराशी दाद मागते. पण हे समाजकंटक तिला, तिच्यावर झालेल्या अन्याय, अत्याचाराची पुरावे मागून गप्प करतात, अशा या दीन-दुबळ्या स्त्रीने कुणाकडे जावे कुणाला दाद मागावी असा सवाल ही करतात व अशा स्त्रीला 'आता झुरणे झुगार गं...' प्रतिकार हात उगार गं... अशी प्रेरणा ही देतात. आता स्त्रियांनी झुरणे बंद करुन अन्यायाला प्रतिकार करावा, यासाठी कवी प्रस्तूत कवितेत प्रेरणा देतात.

कवी रविचन्द्र हडसनकर 'तळगर्भाची वेणा' या कवितेत स्त्री आपल्या पतीशी कशाप्रकारे एकनिष्ट राहते. पतीलाच आपला देव मानते. परंतू तिचा हा पती दिवसा ढवळ्या अनेक आया-बहिणीची रज्जत अब्रू लुटतो. या स्त्री देह लुटारुवरती कवी प्रहार करताना दिसतात,

ही तळगर्भाची वेणा,
का सजविता हा मेणा,
मेणाचे मोल कुंकवाला,
मग भाळाची का दैना, ?
राव साव अन् छंदी,

शील लुटारु व्यापारी,

कैक आया बहिणींची,

का रात जळे दुपारी ?''[५८] पृ. क्र. ४६

तर कवी 'माथा' या कवितेत स्त्रीवर येणाऱ्या दु:खाना सामोरे जात, आपला संसार, सुखी, समृद्धी व्हावा म्हणून आतोनात श्रम करते. पुरुषाबरोबरीने कष्ट करुन आपल्या संसाराचा नंदादीप तेवत ठेवणारी, स्त्री 'माथा' या कवितेतून प्रतिबिंबीत होताना दिसते. त्याचबरोबर ती करीत असलेल्या कष्टाची ही जाणीव कवी वाचकांना करुन देतो.

सोन सकाळी उगवे,

तिची रोजचीच गाथा,

घरी दारी शेत शिवारी,

राबतांना उजळ, माथा,....

उसामधी दारे धरी,

उसगाडी धूर करी,

सौख्याने नांदे दुसरी,

गंध कस्तुरी पसरी ''[५९] पृ. क्र. ४७

'तळगर्भाची वेणा' दु:ख स्पष्ट करताना कवी म्हणतो की, स्त्री ही कोणतीही असो. तिला दु:ख भोगावे ते लागते. त्या दु:खाची तऱ्हा वेगळ्या असतात, प्रस्तूत कविता संग्रहात गावक्रुसाबाहेरील भटकंती करणाऱ्या स्त्रीचे जग कवीने अत्यंत बारीक तपशीलासह चित्रित केले आहे. त्यांना कविताचे नायक करुन कवितेला वेगळा पायंडा पाडला आहे.

## ८) भटकंती करणाऱ्या स्त्री जीवनाच्या आशय व्यक्त करणाऱ्या कविता :-

कवी रविचन्द्र हडसनकर यांनी प्रगत समाजजीवनातील स्त्री जीवनाचे चित्रण करीत असताना, भटकंती करुन आपले जीवन व्यथित करणाऱ्या, स्त्रीलाही आपल्या

कवितेतून कवींनी गिसाडी या जमातीतील स्त्रीला जगावे लागणारे जीवन तिची असणारी दैनंदिनी आपल्या नित्य व्यवसायाशी एकरुप झालेली स्त्री 'पाल गळका ' या कवितेत साकार होते.

''गावची सारी दूखनं,
सेवटून देता देता,
पदर खोचून घणाचे घाव,
घालतांना मी तिला पाहिलं, ..
ऐरणी वरील तिच्या जीवाच्या,
ठिणगी ठिणगीचं फुल,
तिनं गावाला का वाहिल ? ''[६०] पृ. क्र. ४८

'गिसाडी' समाजातील स्त्रीया आपल्या जीवाचे रान करुन, कष्ट करतात व व संपूर्ण गावाला इकणं पुरवितात हे करीत असताना तिच्या जीवाची झालेली ठिणगी, ठिणगी, तिने जणू काही फुलवून गावालाच वाहिली आहे, असा अर्थ या कवितेतून मांडला आहे.

तसेच 'लमाण' या समाजातील स्त्रीच्या व्यथा वेदना 'लमाण तांडा' या कवितेत शब्दबद्ध करताना कवी म्हणतो,

''शिवालयाच्या कडे कपारी
पळस फुलासम, का जळे दुपारी ?
लमाण तांडा, मी करत जपतो
मोह फुलांच्या, का धगीत खपतो ?''[६१] पृ. क्र. ४९

वरील कवितेच्या काव्यपंक्तीतून कवीने लमाण जमातीतील जीवनाला किती जवळून पाहिले आहे. याची जाणीव करुन देणाऱ्या आहेत. कवी 'लमाण' समाजातील स्त्रिया कशाप्रकारचे वस्त्र परिधान करतात हे सांगत असताना 'माझी याडी' असे उद्‌गार काढून 'लमाण' समाजाविषयी असलेली आत्मीयता जिव्हाळा, आपुलकी

याचाच प्रत्यय देतात. असे या समाज जीवनाचा माझ्या अक्षरांची व मी त्यांना आपल्या कवितेच्या माध्यमातून प्रकट करु शकतो. याचे समाधान कवी व्यक्त करतात.

रविचन्द्र हडसनकर 'साऱ्याजनी ' या कवितेतून अशाच भटकंती करुन आपला परंपरेने चालत आलेला व्यवसाय चालवित आहे. त्यात सूख समाधान मानून गाव गाड्यात आले जीवन कशाप्रकारे व्यथित करत राहतात. याचे असे बोलके चित्र रेखाटले आहे. या स्त्रिया घरी राहून, कशा प्रकारची कामे करतात व गावगाड्याला धरुन आपला व्यवसाय कसा चालू ठेवतात याचे प्रत्ययकारी चित्रण हडसनकरांची 'साऱ्या जनी' ही कविता करताना दिसते. या स्त्रियांच्या कामाचे स्वरुप चित्रित करताना हडसनकर म्हणतात.

राधाई लमाणं, चोळी लंगा लालं,
नाचं धुंद तालं, शिमग्याला....
कैक जाती तरी, धुणं तळ्याकाठी,
साऱ्या पोटासाठी, राबतात....,
असा गाव गाडा, हासतं संगती,
सुखानं नांदणी, साऱ्या जनी... ''[६२] पृ. क्र. ७१

तर हडसनकर वैदू स्त्रीच्या जीवनाचे ही चित्रण आपल्या कवितेत प्रभावीपणे करताना दिसतात, वैदू स्त्री आपल्या उदर निर्वाहासाठी गावोगाव कशी भटकंती करते. या भटकंतीत तिला कशाप्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागते. तसेच अंगावरती असलेल्या फाटक्या चिंध्यातून तिच्या देहाची होणारी फटफजिती वासनांध नजरा कशा टिपतात आणि या वासनांध नजरा पाहून ती स्त्री कशी प्रतिक्रिया देते. हे हडसनकर पुढील कवितेतून सांगतात,

''कमरेला बुरगुंडा बांधून,
सुभा घे, पोत घे, मणी घे म्हणत,

भटक्या वैदूबाईची,

हिंग घे, डिकामली घे... अशी भटकंती,

गल्लोगल्ली कुत्री भुंकती,

उगारते हातातली फोकारी,

माझ्या काळजात तिची ललकारी ...''[६३] पृ. ७४

## १) ग्रामीण स्त्री जीवनाचा आशय व्यक्त करणारी कविता :-

हडसनकरांनी ग्रामीण जीवन जगत असताना, स्त्रीच्या वाट्याला येणारी जीवनाची करुण कहाणी ही आपल्या कवितेत सांगितलेली आहे. 'आदिवासी पोर' या कवितेतून कवी ग्रामीण जीवनाला सामोरे जाणारी स्त्री आपल्या दु:खाना सहज करत जीवन जगते. ती आपले दु:ख कधीच कुणापाशी उलगडून दाखवत नाही. असाच आशय त्याची आदिवासी पोरं ही कविता व्यक्त करते. तर हडसनकरांनी 'घार' या कवितेतून घार जशी आपल्या पिल्लांना चोंचीणे चारा भरवत, सांभाळीत असते. तिच्यासारखे ग्रामीण जीवनातील स्त्री आपल्या जीवनाचा गाढा न टाकता ओढीत राहते. दु:खाचे किती ही पहाड कोसळले तरी ती तिचे श्रम कधीही चुकत नाही. फाटक्या जीवनाला टिगळ लावीत ती काळानुसार ताठपणांनी उभी राहते. हे सांगत असताना हडसनकर म्हणतात,

''यातनांचे पहाड,

तिचे श्रमणे चुकत नाही,

फाटक्या जीनगानीला,

ती ठिगळं लावते,

अडते, मोडते,

पुन्हा पुन्हा घडते,

काळापुढे वाकत नाही''[६४] पृ. ५२

त्यापुढे जाऊन 'दिस सुना जाईना' या कवितेतून ग्रामीण स्त्रीची दैनंदिनी क्रमशाः मांडीत जातात. खेड्यातील स्त्री पहाटेचे उठून ते संध्याकाळी निजेपर्यंत अविरत कष्ट करीत राहते. स्त्रीच्या या दैनंदिनीला शब्दबद्ध करताना म्हणतात,

"सडा सारवणानेच

तिची पहाट बांग देते

न्याहरी करुन, पारगीची

ती शिदोरी बांधून घेते..."[६५] पृ. ५३

तर 'बोभटा' या कवितेत कवी स्त्रीला काहीच न करता तिने असेच केले असा प्रत्यारोप करुन बदनाम केले जाते. याचे चित्रण या कवितेत करतात.

आडवाटे पायी रुतला ग काटा,

गावभर उगाच हा बोभटा....

रानवारा पिऊन ती दरीने हिंडते,

शेती शिवारी, ती तिलाच धुंडते,

ती तिची असून, तिची नाही,

तिच्याच का, सून्या दिशा दाही.... ?"[६६] पृ. क्र. ५४

कवी हडसनकर "टॉ हॉ " या त्याच्या कवितेतून स्त्री गर्भवती असतानासुद्धा आपले श्रम न थांबविता काम करतच राहते. हे काम करत असताना तिला मातृत्व प्राप्त होते. याचे चित्रण कवी या कवितेत करताना दिसून येतात.

"कणसं खुडतांना,

तिचा भातोंडा फुटला,

तळगर्भात धागा, धागा,

किती तटतटला.... !

पहिला वहिला तो

ट्यॉ हॉ कानी आला

तिचा रोम रोम

धन्य धन्य झाला....''[६७] पृ. क्र. ५५

त्यापुढे जाऊन हडसनकर असे म्हणतात की, या जगत माऊलीने जन्माला घालून जी धन्यता दिली आहे. तिला दुसरी उपमाच नाही. या माऊलीने जोडलेली नाळ ती आयुष्यभर त्रिकाळ अशीच अंगाभर ओढून घेईन अशी ग्वाहीच जणू कवी देतात. या काव्य पंक्तीवरुन प्रत्ययास येईल.

''तूच जोडलेली,

मी नाळ कशी तोडू,

त्रिकाळ तुझी माया,

किती अंगभर ओढू....!'' पृ. ५५

स्त्री जीवनाची विविध रुप चित्रीत करताना कवी कधी प्रियेशी कधी 'आई' तर कधी शेतात रानात माळात राबणारी कष्ट करणारी 'घर धनीन' चित्रीत करुन तिने मानव जातीशी जोडलेली नाळ चित्रित करतो.

## १०) स्त्री जीवनातील दु:खाचे चित्रण करणाऱ्या कविता :

कवी रविचन्द्र हडसनकर आपल्या कस्तुरी शिल्प पाऊस ती आणि 'बगवं' या कवितेतून स्त्री जीवनातील दु:खाला हुंकार घालण्याचा प्रयत्न करतात. कवी कस्तुरीच्या कवितेत स्त्री आपल्या अब्रुची राखण करण्यासाठी प्राणपणाला कशी लावते, हे सांगितले आहे. हे सांगत असताना कवी म्हणतात,

''त्या तिपारी नभ पघळून,

तिच्या शिवारी वाकले,

होत्या नव्हत्या दौलतील

त्यांच्यासह तिने झाकले, ....''[६९] पृ. क्र. ५६

'ती' या कवितेतून स्त्री या समाजात आपली लाज लज्जा सांभाळून कसे जीवन जगत आहे. याचे हृदय स्पर्श चित्रण कवी करताना दिसतात. समाजातील वास्तवच

यांची कविता मांडीत आहे, असेच मनोमन वाटते. कवी या स्वार्थी जगात स्त्री आपले सत्व जपण्यासाठी कशी धडपडत आहे याचे वर्णन करताना पुढे ते म्हणतात.

''वाखवरवल्या नजरा,

लाज लपेटून,

कशी बशी तगून,

ती जगता जगताच भरत आहे....'' ७० पृ. क्र. ५६

स्त्रीने आपला पती परमेश्वर मानलेला देवच आपल्या शरीराचे कसे धिंडवडे काढतो हे सांगितले आहे.

''तिच्या नवऱ्यानेच,

तिला फडात विकलं,

तिच्या फडात कोल्हेकुई,

तिला झालेले दंश,

माझ जीव लाही लाही,

आता तिने कात टाकली,

ती कशी फुस्कारत आहे ...''७१ पृ. क्र. ६८

स्त्री कितीही बदलली तरी हे दु:खाचे ठिगळ तिच्या शरीराला जोडलेलेच आहे. ही तिच्या आयुष्याची परवड कधीच संपलेली नाही. तिच्या साऱ्या स्वप्नांचा चक्काचुरा झाला आहे. ती दु:ख, व्यथा, वेदना, यातच आपले आयुष्य संपवत आहे, असे कवी 'बगवं' या कवितेत मांडताना म्हणतात,

''खांद्यावर तिच्या, कष्टाची कावडं,

नाही परवडं, सपंलेली,

कपाळ करंटी, संपेनात भोगं

चुलीतील आगं, पोटामधी....''७२ पृ. क्र. ७०

स्त्री आपल्या जीवनाचा जोडीदार म्हणून पुरुषाला आपले आयुष्य वाहत असते. परंतू हा रिकामा टेकडा पती तिच्या फक्त पोरवाड्या पुरताच कामाला येतो आणि त्याच्या नावाने कपाळी लावलेले कुंकू तिला आयुष्यभर दु:खच घेऊन बसावं लागते. असं सांगाताना कवी म्हणतात,

देवळीत भलं, कुंकाचं बगवं,

दु:खाचं उगवं, भाळी तिच्या....

जन्माची वैरीन, दैनानाही जातं

रुते काळजात, अवकळा.... ''[७३] पृ. क्र. ७०

## ११) स्त्री मनातील सुख सुलभ भावना व्यक्त करणाऱ्या कविता :

कवी रविचन्द्र हडसनकरांनी स्त्री जीवनातील कर्तृत्व स्त्रीच्या समस्या स्त्रीची होणारी ससेहोलपठ स्त्री जीवनाच्या वाट्याला आलेली भटकंती याबरोबर स्त्रीच्या अंतरमनातील घालमेलही शब्दबद्ध केली आहे. कवीनी स्त्री मनातील सुखसुलभ भावना चित्रित करताना अनेकविध प्रतिमा, प्रतीकांचा वापर केलेला आहे. 'पेठ' या कवितेत कवींनी 'आषाढ' महिन्याची चाहूल लागतच एखाद्या नव्या नवरीच्या मनात फुलून येणारे भावविश्व आपल्या लेखनीत बंदिस्त केले आहे. या स्त्री मनातील भावनांचे चित्रण करताना कवी म्हणतात,

''मृगधारांनी न्हात आला,

उल्हासाचा सण आषाढी,

नव्या नव्हाळी नवरींचे

मन माहेराला ओढी ...''[७४] पृ. क्र. ६०

पुढे जाऊन कवी अशी ही नवी नवरी आनंदाच्या भरात आपले सारे देहभान विसरुन जाते. तिला लागलेली माहेरची ओढ तसेच तिने मनोमन रंगविलेले स्वप्ने चित्रित करताना कवी म्हणतात.

"साजनेबाई लई घाई,
वय विसरुन झोका झुले....,
पदर उडे भिरी भिरी,
गाणं पंचमीचं फुले..." [७५] पृ. क्र. ६०

तर याच कवितेत कवी 'पोळा' व 'दसरा' या उत्सवात मानवी जीवनात झालेला हर्ष आपल्या शब्दांत मांडीत राहतात. तसेच या काळात साऱ्याच वनराईनसुद्धा चैतन्य निर्माण होते. सारे शिवार फुलून येते. अशा या बदलामुळे मानवी जीवनातील आडपिडा या साऱ्याचा विसर त्यांना पडावा असे कवी विनवितात. तर 'चुडा' या कवितेचे शिर्षकच अतिशय मार्मिकतेने कवितेचा आशय वाचकांपर्यंत पोहचवितो. एखाद्या स्त्रीला सुवासिनीचा अलंकार असणारे संक्रांत तिचा काळ होऊन येतो. तेंव्हा ती जीवाच्या अकांताने हंबरडा फोडते. तिचे सौभाग्य अंगाची हळद अजून ओली आहे. तोवरच तिच्या ललाटावरील भाग्य रेषा उघडी पडते. अशा दु:खाला ती सहन करु शकत नाही. अशा स्त्री जीवनाचे भाव विश्व यांचे चित्रण केले आहे.

ऐन संक्रातीला तिचा,
हिरवा चुडा फुटला,
तिच्या हंबरड्यासह,
जीव तीळ तीळ तुटला.... '
तिच्या भाळीचे कुंकू गेले,
हळद अजूनही ओली,
नियतीची न कळे हो,
ही कुठली अगम्य बोली ?" [७६] पृ. क्र. ६२

त्याचबरोबर या स्त्रीच्या दु:खात भर म्हणून निसर्गाने ही अवकाळी वादळ सोडून, तिच्या वैविध्याची गाठ बांधली आहे. स्त्री जीवनाची दु:खाची भाषिकाच कवीने चित्रीत केली आहे.

रविचन्द्र हडसनकर आपल्या कवितेतून स्त्री सुलभ भावनांचे चित्रण करीत असताना 'तिन्ही सांजा' या कवितेत म्हणतात,

"'दिवे लागणीला बाई,
मन झालं 'भिरी भिरी'
तिन्ही सांजा आल्या डोळी,
कशी उभी राहू दारी.....'''[७७] पृ. क्र. ६५

वरील काव्यपंक्तीतून कवींनी ग्रामीण स्त्रीच्या मनातील भावविश्व चित्रीत केले आहेत. तिचा प्राणप्रिय असणारा पती तांबड फुटण्यालाच शेतावर गेला आहे. दिवे लागणेची वेळ झाली. तिन्ही सांजा डोळ्यात (उतरल्या) तरीही दिवसभर शिवारात रक्ताचं पाणी करुन कष्ट करणारा माझा प्राणप्रिय पती अजून घरी कसा आला नाही. म्हणून तिचं मन स्थिर नाही. हे हडसनकर या कवितेत सांगताना दिसतात.

रविचन्द्र हडसनकर 'कसे सांगू' या कवितेतून आजच्या समाजात स्त्री जीवनाच्या वाट्याला आलेले दुःख वेगवेगळ्या अंगाने साकारत राहतात. या समाजातील प्रत्येक घराघरात जन्माला आलेल्या स्त्रीच्या वाट्याला नदीच्या कोरडपणाचे जीवनच आलेले आहे. या दुःखाला उराशी बाळगून, ही स्त्री जीवनात येणाऱ्या समस्यांना सामोरे जात आहे. अशा या स्त्रीला शब्दबद्ध करताना कवी म्हणतो,

गंगा, यमुना, कावेरी,
गोदा, पैना, सिंधू, पात्रा,
कोरडीच का रहावी,
घराघरातील कान्होपात्रा.... ?''[७८] पृ. ६९

कवी म्हणतो, स्त्रियांच्यासाठी एवढे सर्व करुन ही स्त्रियांचे दुःख, तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार कमी झाला नाही. नदीत पाणी आहे. पण घशाला कोरड पडली आहे. सर्व जग स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटते. परंतु घराघरातील स्त्रिया

कान्होपात्रा आजही दुःखात आहे. त्यांच्यावरील अन्याय कधी संपणार असा प्रश्न कवीला पडला आहे.

## सारांश :

'राजमुद्रा' हा रविचन्द्र हडसनकर यांचा कविता संग्रह दलित जीवनाचे बदलत्या नवीन जाणिवांचे व दलित चळवळीचे चित्रण करणारा कवितासंग्रह आहे. त्यांची कविता क्रांतीच्या दिशेने मार्गक्रमण करणाऱ्या माणसांची आणि माणुसकीच्या शोधाची आहे. ती गोंडस अभिव्यक्तीची झूल पांघरणारी नाही. मूल्यगर्भ आशय हीच तिची प्रकृती आहे. डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेली समता आज अस्तित्वात नाही. ती बोधी वृक्षाला टांगली जात आहे. जो तो वेगवेगळ्या गटा-तटाच्या फांद्या पकडून बसला आहे. गोरगरीब जनतेला वेठीस धरतो आहे. यावर उपाय म्हणून कवी माणुसकीच्या दिशेने झेपाविण्याचा प्रयत्न करतो.

प्रस्तूत काव्य संग्रहातील विचार जहाल मूल्यगर्भ, आशयगर्भ आहे. जुने घालवून, प्रस्थापितांना नाकारुन, नवीन मानसिकता निर्माण करणारी हडसनकरांची कविता आहे. नव्या सांस्कृतिक विचाराच्या शोधात त्यांची कविता सतत फिरत आहे.

'सूर्यझेप' आणि 'तळगर्भ' हा रविचन्द्र हडसनकर यांचा कवितासंग्रह स्त्रीजीवनाचा सर्वांगीण आलेख चित्रीत करणारा कवितासंग्रह आहे. छोटेखानीच पण आशयगर्भ कविताचा संग्रह सुंदर रेखाटनामुळे आकर्षक झाला आहे.

सावित्रीबाई फुले, पंडिताबाई रमाबाई, पासून तर कर्वे कुटुंबिय ते थेट मदर तेरेसा, साधना आपटे, राणीबंग, कल्पना चावला, किरण बेदी, अशा किती तरी कर्तृत्ववान स्त्रियांचा इतिहास सांगता येईल. याचबरोबर सुलोचनादीदी, लता मंगेशकर, ललिता पवार, विठाबाई नारायण गांवकर, यमुनाबाई वाईकर, स्मीता पाटीलपर्यंत कलावंत गायक स्त्रियांचा इतिहास कथन करता येईल. राजकारणाच्या इतिहासात इंदिरा गांधीपासून प्रमिला दंडवते, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, प्रतिभा पाटील, आणि सूर्यकांता पाटील अशा कर्तृत्ववान स्त्रियांचा जीवन प्रवास पाहिल्यावर

कवीची लेखणी धारदार बनते. आणि त्यांच्या चिंतन गर्भेतून 'सुर्यझेप आणि तळागर्भ' कवितासंग्रह निर्माण झाला आहे.

याचबरोबर या कवितासंग्रहात अत्यंत महत्त्वाचा विशेष कवीने हाताळला आहे. तो म्हणजे गावकुसाबाहेरील भटकंती करणाऱ्या स्त्रियांचा, त्यांच्या जगण्या मरण्याचा प्रश्न कवीने अत्यंत पोटतिडकीने चित्रमय शैलीतून शब्दबद्ध केला आहे. 'सुया,बिंब विकणाऱ्या स्त्रीयांना कवीने आपल्या कवितेचे नायक केले. त्यांच्या जीवनाला उजाळा दिला, त्यांच्या भटकंतीची कहाणी चित्रीत करुन वरील स्त्रियांच्या बरोबर या स्त्रियांना आणण्याचे स्वप्न कवी बघतो. त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवितो. स्त्रियांची उन्नती घडविण्यासाठी अनेक नेते पुढे आले. परंतु स्त्रियांनी पुढे येणे गरजेचे आहे. त्यामध्ये सूर्यकांता पाटील, सारख्या स्त्रिया राजकारणात, समाजकार्यात आपले कर्तृत्व स्पष्ट करतात. त्यांच्याबद्दल कवीला प्रचंड आत्मयिता व आदर आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा इतर सर्व क्षेत्रातील स्त्रियांनी घ्यावी असे कवी सूचवितो.

शिवाय त्यांच्या कष्टाची, बुद्धीची, कौशल्याची तारीफ करतो. तर कधी त्यांच्यावरचा अन्याय, अत्याचार स्पष्ट करतात. त्यावर उपायही सूचवितात. काही प्रश्नांनी ते अस्वस्थ होतात.

वरील कविता संग्रहातून प्रतिमा, प्रतिकांचा वापर करुन स्त्रियांचे जीवन मांडले आहे. कमी शब्दांत, हलक्या काहीशा अबोल पद्धतीने पूरेपूर सांगतात. परंतू काही वेळेला कविता नको तेथे थांबते. तुटक तुटक मजकूर होऊन, वाचकांना अर्थबोध होत नाही. तरीही स्त्री जीवनाचा अविष्कार वैविध्यपूर्ण रितीने, तळमळीने मांडला आहे. दलित काव्य प्रातांत प्रस्तूत काव्यसंग्रह निश्चित भर घालेल यात शंका नाही.

('राजमुद्रा' या काव्यसंग्रहातील कवितांना नावे नसल्यामुळे कविता संग्रहातील कवितांच्या सुरुवातीच्या ओळी दिलेल्या आहेत.)

# संदर्भ सूची :


१) 'हडसनकर रविचन्द्र, : 'राजमुद्रा', प्रस्तावना, (डॉ. गंगाधर पानतावणे), मुख पृष्ट.

२) 'हडसनकर रविचन्द्र, : 'राजमुद्रा', निर्मल प्रकाशन नांदेड' प्र. आ. २००४ (मित्रा.....) कविता पृ. क्र. ७

३) 'हडसनकर रविचन्द्र, : तत्रैव,

४) 'हडसनकर रविचन्द्र, : तत्रैव,

५) 'हडसनकर रविचन्द्र, : तत्रैव,

६) 'हडसनकर रविचन्द्र, : 'राजमुद्रा' निर्मल प्रकाशन नांदेड, प्र. आ. २००४, (ईज कडाडव तसं,) (कविता) पृ. ४६

७) 'हडसनकर रविचन्द्र, : उनि, ईज कडाडव तसं (कविता) पृ. ४६

८) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि',

९) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', नव्या युगाची आशा तू' (कविता) पृ. ४७

१०) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'सूर्यकुळाचा समृद्ध' (कविता) पृ. ५०

११) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', अत्याचार जुना, येता हे नव्याने' (कविता) पृ.५२

१२) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', बघवेना त्यांना, तुझे मुक्त श्वास (कविता) पृ. ५३

१३) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'कव्हा फुटंल काय नेम' (कविता) पृ. ५९

१४) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'आभाळ कोसळू दे' (कविता) पृ. ६१

१५) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'स्मृतीशेष बापाच्या स्मृती' (कविता) पृ. १२

१६) 'हडसनकर रविचन्द्र, :'उनि', 'समता ममता करुणेचे शांती घोष' (कविता) पृ. १३

१७) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'बहिष्कार पचवून' (कविता) पृ. १८

१८) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'आपुल्याच दु:खावर' (कविता) पृ. ४०

१९) 'हडसनकर रविचन्द्र, :'उनि', 'बोधिवृक्षातळी, साऱ्यांनी एकी केली
(कविता) पृ. १४

२०) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'मुखवट्यांच्या बेगडी दुनियेत' (कविता) पृ. १५

२१) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'अरे म्या पन खुष' (कविता) पृ. ३१

२२) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'गावाचे गावपण तडकतांना' (कविता) पृ. १६

२३) 'हडसनकर रविचन्द्र,: 'उनि', तू 'उत्तुंग भव्य भक्कम' (कविता) पृ. १७

२४) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि',मलाय माहीत अन् तुम्हालाय माहित'
(कविता) पृ.५७

२५) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'तुझ्या श्वासाला लाभे' (कविता) पृ. २३

२६) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'पहाट होण्याआधी' (कविता) पृ. २७

२७) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'राष्ट्रसेवा दलाच्या मुशीतून ' (कविता) पृ. २९

२८) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'मायच्च्यान बा, खरं सांगतोय' (कविता) पृ. ४१

२९) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि' माणसांची नुस्ती भरती,
मंग गाव का वसाड' (कविता) पृ. ३६

३०) 'हडसनकर रविचन्द्र, : 'सूर्यझेप आणि तळगर्भ,'प्रस्तावना,(ना. धो. महानोर) पृ. क्र. ५

३१) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', पृ. क्र. ७

३२) 'हडसनकर रविचन्द्र, : 'सूर्यझेप आणि तळगर्भ' निर्मल प्रकाशन नांदेड
प्र. आ. २००४, वायपन्याची माती (कविता)
पृ. क्र. १२

३३) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'सूर्य भरारी' (कविता) पृ. क्र. १३

३४) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'फलश्रूती' (कविता) पृ. क्र. १४

३५) 'हडसनकर रविचन्द्र, :'उनि', 'पोहे' (कविता) पृ. क्र. १६

३६) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'सातबारा' (कविता) पृ. क्र. १७

३७) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'वसा' (कविता) पृ. क्र. २१

३८) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'वसा' (कविता) पृ. क्र. २१

३९) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'अपेक्षा' (कविता) पृ. क्र. ३३

४०) 'हडसनकर रविचन्द्र,: 'उनि', 'छडा' (कविता) पृ. क्र. २४

४१) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'विकासगंगा ' (कविता) पृ. क्र. २५

४२) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'ऋचा' (कविता) पृ. क्र. २६

४३) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'ओंजळ ' (कविता) पृ. क्र. २९

४४) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'मुद्रा ' (कविता) पृ. क्र. ३०

४५) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'पासोडी' (कविता) पृ. क्र. ३१

४६) 'हडसनकर रविचन्द्र,: 'उनि', 'देठातून' (कविता) पृ. क्र. ३२

४७) 'हडसनकर रविचन्द्र, : 'सूर्य झेप आणि तळगर्भ', 'प्रस्तावना,' (ना. धो. महानोर) पृ. क्र. ६

४८) 'हडसनकर रविचन्द्र, : 'सूर्य झेप आणि तळगर्भ', 'निर्मल प्रकाशन नांदेड', 'विश्वास' कविता पृ. क्र. ३६

४९) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'ऋतू' (कविता) पृ. क्र. ३७

५०) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'पारणे' (कविता) पृ. क्र. ३८

५१) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'परिशिष्ट' मधील क्र. २ (कविता) पृ. क्र. ३९

५२) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'परिशिष्ट' मधील क्र. २(कविता) पृ. क्र. ४०

५३) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'परिशिष्ट' मधील क्र. २(कविता) पृ. क्र. ४०

५४) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'परिशिष्ट' मधील क्र. ३ (कविता) पृ. क्र. ४१

५५) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'परिशिष्ट' मधील क्र. ४(कविता) पृ. क्र. ४२

५६) 'हडसनकर रविचन्द्र, : 'सूर्य झेप आणि तळगर्भ' निर्मल प्रकाशन नांदेड प्र. आ. २००४ 'हंबरडा (कविता) पृ. क्र. ४५

५७) 'हडसनकर रविचन्द्र, : 'उनि', 'हंबरडा' (कविता) पृ. क्र. ४५

५८) 'हडसनकर रविचन्द्र,: 'उनि', 'तळगर्भाची वेणा, (कविता) पृ. क्र. ४६

५९) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'माथा ', (कविता) पृ. क्र. ४७

६०) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'पाल गळका' (कविता) पृ. क्र. ४८

६१) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'लमाण तांडा', (कविता) पृ. क्र. ४९

६२) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'साऱ्या जनी' (कविता) पृ. क्र. ७१

६३) 'हडसनकर रविचन्द्र, :  'परिशिष्ट क्र. २ मधील २ नं. (कविता) पृ. क्र. ७४

६४) 'हडसनकर रविचन्द्र,: 'सूर्यझेप आणि तळगर्भ, निर्मल प्रकाशन नांदेड प्र. आ. २००४ 'धार'(कविता) पृ. क्र. ५२

६५) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'दिस सुना जाईना ' (कविता) पृ. क्र. ५३

६६) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'बोभाटा' (कविता) पृ. क्र. ५४

६७) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'ट्याँ हाँ ' (कविता) पृ. क्र. ५५

६८) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'ट्याँ हाँ ' (कविता) पृ. क्र. ५५

६९) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'कस्तुरी ' (कविता) पृ. क्र. ५६

७०) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'ती ' (कविता) पृ. क्र. ६८

७१) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'ती ' (कविता) पृ. क्र. ६८

७२) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'बगवं ' (कविता) पृ. क्र. ७०

७३) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि', 'बगवं ' (कविता) पृ. क्र. ७०

७४) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'पेठ ' (कविता) पृ. क्र. ६०

७६) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'चुडा ' (कविता) पृ. क्र. ६२

७७) 'हडसनकर रविचन्द्र, :  'उनि', 'तिन्ही सांज ' (कविता) पृ. क्र. ६५

७८) 'हडसनकर रविचन्द्र,:  'उनि,' 'कसे सांगू'(कविता) पृ. क्र. ६९